रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ६९
www.ramprahar.com
गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य बनलेय -मुख्यमंत्री शिंदे/२
उरण विधानसभा क्षेत्रासाठी 'मविआ'मध्ये रस्सीखेच/३
टी-२० वर्ल्डकपसाठी भारत सज्ज; ३ ऑक्टोबरपासून थरार/८

## खोपोलीच्या झेनिथ धबधब्यावर तरुणीचा बुडून मृत्यू



**खोपोली, खालापूर :** परतीच्या पावसाने बुधवारी (दि.२५) सायंकाळी तुफान फटकेबाजी केली. दरम्यान खोपोलीतील एक कुटुंब पावसाचा आनंद घेण्यासाठी झेनित वॉटर फोर्ट वर पोहचले होते, मात्र पावसाचा जोर वाढल्याने तेथे पर्यटक अडकले. या घटनेची खबर मिळताच अपघातग्रस्त मदत टीमचे सदस्यांनी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पर्यटकांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र यातील एक मुलगी वाहून गेली. सर्वत्र शोधाशोध केल्यानंतर तिचा मृतदेह सापडला. स्वप्नाली शिरसागर (वय २२) असे त्या मुलीचे नाव आहे. आयेशा शेख आणि मोनिका शिरसागर या महिलांना वाचवण्यात रेस्क्यू टीमला यश आले. झेनिथ वॉटर फॉलवर प्रशासनाने बंदी घातली असतानाही पर्यटक जीव धोक्यात घालून या धबधब्यावर जात असतात त्यामुळे दुर्दैवी घटना घडत असतात, अशा प्रतिक्रिया उमटल्या.

# मराठा आरक्षण आम्ही कोर्टात टिकवले

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नवी मुंबईत स्पष्टोक्ती

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठा समाजाला आम्ही आरक्षण दिले. ते कायद्याच्या चौकटीत बसवले. त्यामुळे ते कोर्टात टिकले. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० टक्के आरक्षण दिले, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते बुधवारी (दि.२५) वाशी एपीएमसीतील कांदा बटाटा मार्केटमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या ९१व्या जयंतीनिमित्त बोलत होते.



या वेळी फडणवीस म्हणाले की, सध्या आरक्षणाच्या बाबतीत वेगळ्या मागण्या आहेत. या मागण्या कायद्याच्या चौकटीत बसणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादा निर्णय घ्यायचा आणि तो कायद्याच्या चौकटीतून पहावा लागतो. यंदा पोलीस भरती झाली. त्यात १० टक्के मराठा तरुणासाठी आरक्षण ठेवण्यात आले होते. मराठा तरुणांना या भरतीत नोकऱ्या मिळाल्या, मात्र कोणाचे म्हणणे वेगळे असू शकते. हक्क मिळावेत मात्र समाजात दुफळी निर्माण होऊ नये. सारथीच्या माध्यमातून अनेक स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. नवी मुंबईतील पंतप्रधान आवास योजनेतील घरांत, माथाडी कामगारांना प्राधान्य देत येईल यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल, असे फडणवीस म्हणाले.

या वेळी आमदार शशिकांत शिंदे यांनी सांगितले की, माथाडी कामगार हाही तसा अल्पभूधारक असून पंतप्रधान आवास योजनेतील घरे ही माथाडी कामगारांना मिळाली पाहिजेत. नाशिकच्या माथाडी कामगारांचा लेव्हीचा प्रश्न त्वरीत सोडवावा वडाळा येथील सोळा एकरावर ३५०० माथाडी कामगारांच्या वसाहतीचा प्रश्न लवकरच सोडवावा, अशी मागणी आमदार शिंदे यांनी केली.

या वेळी आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, निरंजन डावखरे, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, नवी मुंबई पालिकेचे आयुक्त कैलास शिंदे, अशोक डक, पी.एल.खंडागळे, भारती पाटील, चंद्रकांत पाटील, संजय पानसरे, अशोक वाळुंज, शंकर पिंगळे, कीर्ती राणा, बाळासाहेब भिंडे आदी उपस्थित होते.

# हुतात्मा नाग्या कातकरी यांचा सर्वांना सार्थ अभिमान -आमदार प्रशांत ठाकूर

## चिरनेर अक्कादेवी वाडीवर अभिवादन कार्यक्रम



**उरण : प्रतिनिधी**

चिरनेर अक्कादेवी कातकरीवाडी येथील २५ सप्टेंबर १९३० झाली झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली लढ्यातील आदिवासी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांनी इंग्रज सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडले होते. त्यांचा सर्वांना सार्थ अभिमान आहे, असे गौरोदगार आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि.२५) काढले.

वनवासी कल्याण आश्रम कोकण प्रांताच्या वतीने २५ सप्टेंबर १९३० झाली झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली लढ्यातील आदिवासी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांचा हुतात्मा दिन चिरनेर अक्कादेवी कातकरीवाडी धरणाजवळ सत्याग्रहाच्या मुख्य ठिकाणी अभिवादन कार्यक्रम झाला. या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालूका अध्यक्ष रवि भोईर, वनवासी कल्याण आश्रमाचे तालूका अध्यक्ष मनोज ठाकूर, मीरा पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, उद्योजक देवेंद्र पाटील, युवा नेते प्रतिक गोंधळी, रमेश फोफेरकर, सुशांत पाटील, युवा नेते प्रतिक गोंधळी, ग्रामपंचायत सदस्य समीर डुंगीकर, माजी ग्रामपंचायत सदस्य रमेश फोफेरकर, सुशांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



**उरण : आमदार प्रशांत ठाकूर यांनी चिरनेर येथे जाऊन हुतात्मा स्तंभाला विनम्र अभिवादन केले.**

या वेळी उरण, पनवेल, पेण, अलिबाग, ठाणे, पालघर येथील आदिवासी समाज उपस्थित होता. **(पान २ वर..)**

# राज्यात परतीच्या पावसाचा धुमाकूळ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यभरात हवामान विभागाने पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. परतीच्या पावसाने बुधवारी (दि.२५) राज्यातील अनेक भागांमध्ये चांगलाच तडाखा दिला आहे.



दुपारपासूनच राज्यातील अनेक शहरात पावसाने गर्द काळोख केला होता. विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह मुंबई, पुणे, कल्याण आणि राज्यातील अनेक भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. दरम्यान रायगड, रत्नागिरी आणि विदर्भ व मराठवाड्यातदेखील अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कोरडार पावसाने हजेरी लावली आहे.

सकाळपासून मुंबईत पावसाने जोरदार बॅटींग सुरू केली आहे. मुंबईच्या मुलुंड, भांडुप, नाहूर, कांजुरमार्ग आणि विक्रोळीसह घाटकोपर भागात पाऊस सुरू झाला आहे. पावसाचा जोर कायम आहे. यामुळे भांडुपच्या सखल भागात पाणी साचायला सुरुवात झाली आहे. पाणी साचल्यामुळे वाहतूक संथ गतीने सुरू आहे. पुणे शहरात मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते जलमय झाले. शिवाजीनगर, एरंडवणे, सिंहगड, बाणेर रस्ता, सातारा-कात्रज रस्ता, हडपसर अशा अनेक भागात ठिकाणी पावसाने हजेरी लावली.

दरम्यान, रायगडातील अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीमध्ये तुफान पर्जन्यवृष्टी झाल्याने घरांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## काँग्रेसच्या डीएनएमध्येच आरक्षणविरोध -पीएम मोदी

**हरियाणा :** येथील विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या राज्यात प्रचारसभा घेत आहेत. सोनीपतमध्ये बुधवारी (दि.२५) झालेल्या प्रचारसभेत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसला लक्ष्य केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, काँग्रेसच्या शाही परिवारातून जो कुणी पंतप्रधान झाला, त्याने आरक्षणाला विरोध केला. आरक्षणाला विरोध काँग्रेसच्या डीएनएमध्ये आहे. त्यामुळेच आजही काँग्रेसच्या शाही कुटुंबातली चौथी पिढीदेखील आरक्षणाला हटवण्याची चर्चा करते, अशी टीकाही त्यांनी केली. हरियाणामध्ये ५ ऑक्टोबर रोजी मतदान होत असून ८ ऑक्टोबरला हरियाणा व जम्मू-काश्मीरसाठीची मतमोजणी पार पडेल.

## निवडक

### योजनेत गैरप्रकार; सहा जणांवर कारवाई

**अकोला :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया अजून सुरू आहे. यातच आता लाडकी बहीण योजनेसाठी सहा पुरुषांनी अर्ज केल्याचा प्रकार समोर आला आहे. हे सर्व जण अकोल्यातील आहेत. या सहा जणांचे आधार कार्ड महिला आणि बालकल्याण विभागाकडून निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

### आंबेनळी घाटामध्ये दरड कोसळली; पथकाची कार्यवाही

**पोलादपूर :** तालुक्यातील आंबेनळी घाटामध्ये मंगळवारी रात्री ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यानंतर चिरेखिंड धनगरवाडीतील डोंगरामधून ओढ्यासारखा पावसाच्या पाण्याचा प्रवाह सुरू झाला आणि लाल मातीचे ढिगारे तसेच मोठमोठ्या आकाराचे दगड घाटरस्त्यामध्ये आले. या वेळी आपत्तीनिवारण आणि व्यवस्थापन व प्रतापगड रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी आंबेनळी घाटरस्त्यामध्ये आलेले मोठे दगड बाजूला करून ओढासदृश्य पाण्याचा लोट दरीकडे जाण्यासाठी वाट निर्माण करून दिली.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये विकासचक्र

## ग्रामीण भागात कामांचे भूमिपूजन; मान्यवरांसह ग्रामस्थांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली होत आहे. त्यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात सुमारे एक कोटी १८ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ बुधवारी (दि. २५) झाला. या कामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)





आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा मतदारसंघात अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार त्यांच्या माध्यमातून २० लाख रुपयांच्या निधीमधून ग्रामपंचायत भिंगार शेडूंग गावात हनुमान मंदिर ते रामदास खेत्री यांच्या घरापर्यंत गटार व रस्ता काँक्रिटीकरण, १० लाख रुपयांच्या निधीमधून शेडूंग गावात अंतर्गत रस्ता तयार करणे, १० लाख रुपयांच्या निधीमधून भेरले अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण करणे, १० लाख रुपयांच्या निधीमधून भेरले येथे सभामंडपाला शेड बांधणे, १० लाख रुपयांच्या निधीमधून भेरले गावात अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण करणे, १० लाख रुपयांच्या निधीमधून भिंगार अंतर्गत रस्ता व गटार करणे, १० लाख रुपयांच्या निधीमधून भिंगार गावात अंतर्गत रस्ता तयार करणे, आठ लाख रुपयांच्या निधीमधून भिंगार येथे गटार व रस्ता तयार करणे, १० लाख रुपयांच्या निधीमधून वारदोली अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण करणे, १० लाख रुपयांच्या निधीमधून सांगडे गावात अंतर्गत रस्ता तयार करणे, लोणीवली गावात १० लाख रुपयांच्या २५/१५ निधीमधून गणपत मालुसरे ते सुभाष पाटील यांच्या घरापर्यंत काँक्रिटीकरण करणे येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह माजी जि. प. सदस्य राजेंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा मोर्चा पनवेल तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, युवा मोर्चा विभागीय अध्यक्ष योगेश लहाने, भिंगारचे सरपंच सुभाष रामदास वाघमारे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, सदस्य सुनील पाटील, माजी सरपंच सुभाष जेठू पाटील, वारदोलीचे सरपंच राम भवर, उपसरपंच आनंता पवार, भेरले सरपंच गुलाब वाघमारे, उपसरपंच अशोक गायकर, चिखले ग्रामपंचायत उपसरपंच पुजा पाटील, निलेश पवार, शेडूंचे सदस्य दिना राजेश पाटील, भिंगार विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, विठ्ठल दुर्गे, रवि दुर्गे, रमेश शेदरे, शंकर पाटील, किशोर सुरते, मंगेश गायकवाड, मोहन दुर्गे, सजिश पाटील, दिगंबर पाटील, तुळशीराम पाटील, अप्पा भागीत, माजी सरपंच बाळू भुतांबरा, माजी उपसरपंच हेमंत तांडेल, जितेंद्र बताले, कैलास पाटील, कल्पेश भोईर, तेजेश शेळके, महादु मिसाळ, **(पान २ वर..)**

# ऋषिकेश पेणकर यांना सुवर्णपदकासह मिस्टर युनिव्हर्स इंडिया किताब

## परेश ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

द इंटरनॅशनल फिटनेस अँन्ड बॉडीबिल्डिंग फेडरेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेत पनवेलच्या ऋषिकेश राजेंद्र पेणकर यांनी सुवर्ण पदकासह आयएफबीबी मिस्टर युनिव्हर्स इंडिया किताब पटकावला. त्याबद्दल त्यांचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन केले.

द इंटरनॅशनल फिटनेस अँड बॉडीबिल्डिंग (आयएफबीबी) फेडरेशन ही बॉडीबिल्डिंग आणि फिटनेससाठी आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्रीडा प्रशासकीय संस्था आहे. जागतिक आणि कॉन्टिनेंटल चॅम्पियनशिप स्पर्धा आयोजित करते. आयएफबीबीच्या वतीने २० ते २२ सप्टेंबरपर्यंत शरीरसौष्ठव स्पर्धा गोरेगाव येथील नेस्को एक्सिबिशन सेंटर येथे झाली. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत ऋषिकेश पेणकर यांनी पुरुष गटातील फिजिक विभागात सर्वोत्कृष्ट कामगिरी केली.




**देदीप्यमान कामगिरीमुळे पनवेलच्या शिरपेचात मानाचा तुरा**

ऋषिकेश पेणकर यांनी सुवर्ण पदकासह मिस्टर युनिव्हर्स इंडिया किताब पटकावत मेन्स फिजिक ओव्हर ऑल आयएफबीबी प्रो कार्ड प्राप्त करण्याचा बहुमान मिळविला. त्यांनी केलेल्या देदीप्यमान कामगिरीमुळे पनवेलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्याबद्दल पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, शहर सरचिटणीस अमित ओझे, प्रितम म्हात्रे, केदार भगत, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव यांनी अभिनंदन केले.

## गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याचा सरकारचा निर्णय

# पनवेल, उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांमध्ये समाधान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील पनवेल व उरण तालुका तसेच ठाणे जिल्ह्यातील एकूण ९५ गावातील प्रमुख्याने गावठाणाभोवती केलेली अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा शासन आदेश सरकारने काढला आहे. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी या पूर्वी कसोशीने पाठपुरावा केल्यामुळे राज्य सरकाराला हा निर्णय घ्यावा लागला आहे. गरजेपोटी बांधकाम केलेली घरे नियमित करण्याचा सरकारच्या या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्त आणि गावकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

गरजपोटी केलेल्या बांधकामातील जमिनी नियमित करण्यासाठी सरकारने निर्णय घेतला आहे. नवी मुंबई प्रकल्पातील एकूण ९५ गावांच्या गावठाणाचा १९७० सालच्या गावठाण सीमेपासून दाटीवाटीने असणाऱ्या क्षेत्राचा गुगल ईमेजद्वारे महिन्याभरात सिडकोकडून सर्व्हे करण्याचे आदेश सरकारने दिले आहे.

गरजेपोटी केलेली बांधकामे लक्षात घेऊन त्या अंतर्गत रस्ते, सामाजिक सुविधा आणि खुल्या जागा या दर्शवण्यात याव्यात तसेच या योजनेअंतर्गत मिळालेल्या भूखंडांवर बांधकामासाठी संबंधीत नियोजन प्राधिकरणाचे नियम मान्याता आवश्यक राहतील.

या सर्व बांधकामाचे सर्व्हेक्षण व त्याबरोबर सदर बांधकामांची मोजणी सिडको महाममंडळाने ठाणे आणि रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या समन्वयाने करण्याचे आदेश देण्यात आले आहे. सिडकोच्या १२.५ टक्के योजनेच्या रेखांकनामधील प्रकल्पग्रस्त व त्यांच्या सर्व वारसदारांना २५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत केलेली बांधकामाखालील जमीन तसेच याक्षेत्रामधील जमीन बिगर प्रकल्पग्रस्तांनी शासनाच्या धोरणाप्रमाणे 'ठरलेल्या अखेरच्या तारखेपर्यंत' (cut off date) गरजेपोटी केलेल्या बांधकामाखालील जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात याव्यात.

गरजेपोटी कृती क्षेत्रात सीमेच्या निश्चितीनंतर सीमेच्या आतील सिडकोच्या १२.५% योजनेतील रेखांकीत मोकळे भूखंड तत्काळ नियमाप्रमाणे वाटप करण्यात यावे व सीमेच्या बाहेरील नोडल भागात येणारे भूखंडाची विल्हेवाट नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारीत) नियमावली, २००८मधील तरतुदीनुसार तत्काळ विक्री करावेत. प्रकल्पग्रस्त व त्यांचे सर्व वारसांनी कृती क्षेत्रातील गरजेपोटी केलेल्या बांधकामाखालील जमीन भाडेपट्टयाने देण्यासाठी पुढीलप्रमाणे दर निश्चित करण्यात येत आहेत. **(पान २ वर..)**

# महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य बनलेय

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन




**मुंबई : प्रतिनिधी**

उद्योग, पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणूक क्षेत्रात महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर आहे. राज्यात सेमी कंडक्टर तसेच इतर सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. उद्योगांना मिळणाऱ्या पायाभूत सुविधांमुळे महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य बनल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

इंडिया टुडे कॉनक्लेव्ह २०२४मध्ये मुख्यमंत्री शिंदे सहभागी झाले होते. या वेळी इंडिया टुडेचे संपादक राजदीप सरदेसाई व कार्यकारी संपादक साहिल जोशी यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची विविध विषयांवर मुलाखत घेतली.

दावोसमध्ये सुमारे पाच लाख कोटींची गुंतवणूक झाली. याशिवाय सौरऊर्जा, सेमी कंडक्टर आदी क्षेत्रात राज्यात गुंतवणूक वाढत आहे. नुकतेच नवी मुंबईत सेमी कंडक्टरचा प्रकल्प सुरू झाला आहे. उद्योजकांचा विश्वास वाढल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात उद्योग येत आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण झाल्या आहेत. अटल सेतू, सागरी किनारा मार्ग यामुळे प्रवासाचा वेळ कमी झाला. मेट्रोचे जाळे विणले जात असून लवकरच मेट्रो ३ या भूमिगत मेट्रोचा शुभारंभ होणार आहे. यातून रोज सुमारे १३ लाख नागरिक प्रवास करतील. वाढवण बंदर महाराष्ट्राचा कायापालट करणारा प्रकल्प आहे. वाढवण येथे विमानतळ सुरू करण्याचाही विचार आहे. नवी मुंबई विमानतळही लवकरच सुरू होणार आहे. पुढील दोन वर्षांत मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचा निर्धार आहे. तसेच राज्यातील रस्तेही खड्डेमुक्त करण्यासाठी काम करीत आहोत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

हे सर्वसामान्यांचे शासन असल्यामुळे सर्वसमान्यांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. या योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात आली असून ही योजना पुढील काळातही सुरूच राहणार आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनांचा हातभार लागणार आहे. या योजनांचा फायदा सर्वसामान्य कुटुंबियांना होणार आहे. शासन आपल्या दारी योजनेमुळे सुमारे पाच कोटी नागरिकांना फायदा झाला आहे.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, गेल्या दोन वर्षात राज्यात पूर्ण क्षमतेने विकास होत आहे. वर्षा शासकीय निवासस्थानी व मंत्रालयात येणाऱ्यांना भेटल्याशिवाय मी जात नाही. जनता हिच माझ्यासाठी ऊर्जा आहे. सीएम म्हणजे कॉमन मॅन असे समजून मी काम करतो. त्यामुळे सामान्य माणसाच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी काम करीत आहे.

राज्य व केंद्र शासन हे शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहे. प्रधानमंत्री सन्मान योजनेत शेतकऱ्यांना सहा हजार रुपये मिळतात. राज्य शासन त्यात आणखी सहा हजार देत आहे, तसेच एक रुपयात पिकविमाही राज्य शासन देत असून त्याचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे. बदलापूरमधील घटनेतील आरोपीच्या मृत्यूची चौकशी सुरू असून दोषींवर कारवाई होईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.२४) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ४२७ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून चार लाख २५ हजार २०० रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे बेदरकार वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

## माथेरान पालिकेकडून रस्त्याच्या दुरूस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरातील अनेक भागात पावसाच्या पाण्यामुळे मुख्य रस्त्यांची वाताहत झाली असून या ठिकाणी रस्त्यांवरील खड्डे आणि दगड गोटे यामुळे रस्त्यावरील प्रवास त्रासदायक ठरत आहे. पालिकेने या रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू केली असून नागरिकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे.

माथेरान पर्यटनस्थळी पावसाचे प्रमाण सर्वाधिक आहे. जोरदार बरसणाऱ्या पावसामुळे येथील रस्त्यांची विल्हेवाट लागून चांगलीच दुर्दशा होते. यामध्ये प्रामुख्याने वनविभाग कार्यालय ते पांडे रोडपर्यंतच्या भागात पाण्याच्या प्रचंड ओघामुळे रस्त्याची खूप वाताहत झाली होती. याच रस्त्यावरून ई-रिक्षादेखील धावत असते, तर नगरपालिका कार्यालय व रुग्णालयसुद्धा आहे. त्यामुळे या रस्त्यावरून नागरिकांची पण दररोज ये-जा असते. स्थानिक नागरिक आणि ई-रिक्षाचालकांनी येथे रस्त्यासंदर्भात वारंवार तक्रार दाखल केल्यानंतर येथे माथेरान नगरपालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी त्वरित उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहे.

सध्या या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू असून पायी प्रवास करणारे नागरिक आणि ई-रिक्षाचालक ंना दिलासा मिळाला आहे. स्थानिकांकडून आता यासोबतच अन्य खराब रस्त्यांचीही जलद गतीने दुरूस्ती करण्याची मागणी होत आहे, जेणेकरून पर्यटकांना आणि स्थानिकांना प्रवासात कोणताही अडथळा येऊ नये.

## सुधागडात सात फुटी अजगराला जीवदान

**पाली :** सुधागड तालुक्यातील तांबडमाळ येथे सात फूट लांब अजगर आला होता. या अजगराने कोंबडा फस्त करून तो लाकडाच्या सरपणात शिरला होता. या अजगराला पालीतील सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी चांद शेख यांच्या मदतीने शिताफिने पकडून वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली सुखरूप जंगलात सोडले.

वाडीवर अजगर आल्याची माहिती वनविभाग कर्मचारी मारोती मुंडे यांनी सर्पमित्रांना दिली. त्यांच्यासोबत वनविभागाचे कर्मचारी व राजेश रुईकर हे होते. अजगराला पकडत असताना पाहण्यासाठी वाडीतील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती.

# भारतीय चित्रकार पराग बोरसे यांना अमेरिकेचा पुरस्कार



**माथेरान : प्रतिनिधी**

अमेरिकेच्या पेस्टल सोसायटीने भारतीय कलाकार पराग बोरसे यांना २०२४ सालचा बहुमोल समजला जाणारा फ्लोरा बी गुफिनी मेमोरियल पुरस्कार जाहीर केला आहे. नुकताच मॅनहॅटन, न्यूयॉर्कमध्ये एका आलिशान समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

माथेरान हे आजोळ असलेल्या पराग बोरसे यांच्यावर येथे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

न्यूयॉर्कमध्ये भरलेल्या 'एंडूरिंग ब्रिलियंनस' या नावाने प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या वार्षिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे हे ५२वे वर्ष असून यावर्षी अमेरिकेच्या पेस्टल सोसायटीला जगभरातून ११५५ सबमिशन प्राप्त झाली होती. त्यांनी समावेशासाठी केवळ १२५ कलाकृती निवडल्या होत्या. पराग बोरसे यांचे सॉफ्ट पेस्टल या माध्यमातून चितारलेले 'ए टर्बन गेझ' हे एका फेटा घातलेल्या धनगराचे व्यक्तिचित्रण आहे.

पराग बोरसे यांच्या या चित्राची पुरस्काराकरिता निवड जेरेनिया विल्यम मॅककारथी (द वेस्ट मोरलँड म्युझियम ऑफ अमेरिकन आर्ट, ग्रीन्सबर्ग, पेन्सिल्वेनियाचे मुख्य आर्ट क्युरेटर) या पंचांनी केली आहे. रोख एक हजार अमेरिकन डॉलर्स आणि प्रशस्तीपत्र असेया पुरस्काराचे स्वरूप होते.

पराग बोरसे हे एकमेव भारतीय कलाकार आहेत ज्यांच्या कलाकृतीची या संस्थेने आपल्या वार्षिक प्रदर्शनासाठी चार वेळा निवड केली आहे. पराग बोरसे यांना यापूर्वी दोन वेळा पेस्टल सोसायटी ऑफ वेस्ट कोस्ट अमेरिका यांनी पुरस्कार देऊन गौरवीत केले आहे, तसेच अमेरिकेतून प्रकाशित होणाऱ्या पेस्टल जरनल या मॅक्झिननेसुद्धा त्यांना दोन वेळा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

# वाशीमध्ये बॉयलर इंडिया २०२४चे उद्घाटन

## २६०पेक्षा अधिक उद्योजकांचा समावेश



**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाच्या कामगार विभागांतर्गत असलेल्या बाष्पके संचालनालयाच्या वतीने आयोजित जागतिक स्तरावरील बॉयरल इंडिया २०२४ प्रदर्शन, चर्चासत्र व कार्यशाळेचे उद्घाटन बुधवारी (दि.२५) कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंघल यांच्या हस्ते झाले.

या वेळी मुंबई नौदल प्रकल्पचे महासंचालक व्हाइस डमिरल आर स्वामीनाथन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, केंद्रीय बाष्पके मंडळ नवी दिल्लीचे तांत्रिक सल्लागार संदीप कुंभार, आयसीटी मुंबईचे प्राध्यापक जी. डी. यादव, फोर्ब्स मार्शलचे संचालक आणि मुख्य ऑपरेशन अधिकारी दत्ता कुवळेकर, ऑर्गेन्जबिक टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक भानू राजगोपालन, बाष्पके संचालनालयाचे संचालक धवल अंतापूरकर आदी या वेळी उपस्थित होते.

या प्रदर्शनात इटली, युके, जर्मनी, चीन, स्वीडन, बेल्जीयम, नेदरलँड या देशासह सुमारे २६० उद्योजकांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदविला आहे. बाष्पके (बॉयलर) संबंधित विविध यंत्रे, साहित्य यांची मांडणी येथे आहे. याशिवाय बाष्पके उद्योगातील नवनवीन तंत्रज्ञान, घडामोडी यांची माहिती होण्यासाठी चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन तीन दिवस चालणार आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञ यामध्ये मार्गदर्शन करणार आहेत.

या वेळी बॉयलर मॅन्युफॅक्चरिंग मॅनेजमेंट सॉफ्टवेअर या प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले.

# 'सीकेटी'मध्ये राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये मंगळवारी (दि.२४) राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आले.

कार्यक्रमासाठी पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते व एसएमडीएल कॉलेज कळंबोलीचे प्रो. डॉ. बबन जाधव यांना आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मुंबई विद्यापीठ गीत व एनएसएस गीताने झाली.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या दैदिप्यमान कामगिरीचा उल्लेख केला. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांचे कौतुक केले, तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या अविरत पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा रायगड जिल्हास्तरीय सर्व सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पारितोषिक २०२२-२३ प्राप्त करणाऱ्या कौस्तुभ मुंडे याचा पालकांसह गौरव करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत परकाळे यांनी पनवेल महानगरपालिका व सीकेटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे पर्यावरण संवर्धन संघाची प्रारंभची घोषणा केली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी प्लास्टिकमुक्त भारत, स्वच्छता अभियान या मोहिमेमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास आवाहन केले, तसेच स्वयंसेवकांकडून स्वच्छतेची शपथ देण्यात आली. महाविद्यालयाचे सन २०२३-२४ अनुगूंज अंक प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले.

डॉ. बबन जाधव यांनी, राष्ट्रीय सेवा योजना व स्वयंसेवक, त्यांचे समाजाप्रति असणारे महत्त्व अतिशय उत्तम शब्दांत सांगितले, तसेच एनएसएसमध्ये घेतले जाणारे विविध उपक्रम, याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया चौधरी व आकांशा पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन स्वयंसेविका ज्योती चोहान यांनी केले.

पान १ वरुन

## हुतात्मा नाग्या कातकरी यांचा सर्वांना सार्थ अभिमान -आमदार प्रशांत ठाकूर

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, चिरनेर जंगलसत्याग्रहात देशाच्या स्वातंत्र्यासाठी आदिवासी समाजाच्या हुतात्मा नाग्या महादू कातकरी या विराने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. उरण तालुक्यातील चिरनेर परिसरातील एकूण आठ शूर विरांनी आपले प्राण पणाला लावून जुलमी इंग्रज सत्तेविरोधात २५ सप्टेंबरचा लढा दिला आहे. त्यामध्ये आदिवासी समाजाचे नाग्या कातकरी यांनी महत्त्वाची भूमिका बजावत इंग्रज सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडले होते. त्यांचा सर्वांना सार्थ अभिमान आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये विकासचक्र

रघुनाथ तांडेल, प्रतिक बताले, जानवी बताले, रुपाली पाटील, हर्षदा तांडेल, सुजाता तांडेल, वैशाली पाटील, राणी भोपी, ताई भोपी, कमल पाटील, सुनिता बताले, गंगुबाई भोपी, कुंदा भोपी, ठकुबाई भोपी, सुवर्णा पाटील, संध्या पाटील, हेमलता पाटील, उज्ज्वला पाटील, निशा पाटील, संगीता पाटील, धनश्री पाटील, मनिषा तावडे, सुभाष पाटील, माजी उपसरपंच प्रवीण पाटील, भालचंद्र पाटील, शक्ती केंद्र प्रमुख जेष्ठ रामचंद्र पाटील, बळीराम भोपी, पद्माकर म्हात्रे, माजी सदस्य जयदास पाटील, अंकुश पाटील, सुभाष गातारे, सुर्यकात कडव, एकनाथ पाटील, मनिष पाटील, रूपेश म्हात्रे, मंगेश पाटील, दिनेश पाटील, अक्षय पाटील, जनाबाई पाटील, प्रतिक्षा पाटील, भारती पाटील, माजी सरपंच सतिश मालुसरे, माजी उपसरपंच संपदा पालव, सुवर्णा पाटील, नथुराम मालुसरे, ज्येष्ठ कार्यकर्ते आत्माराम मालुसरे, मनोहर मालुसरे, नाना पाटील, रमेश पवार, अशोक भालेकर, दिनकर भालेकर, विठोबा मालुसरे, सावळराम मालुसरे, गणेश चव्हाण, ज्ञानेश्वर मालुसरे, वसंत पाटील, अनंता पाटील, भाऊ चव्हाण, सुरेश नाईक, रामदास वाघमारे, मनु वाघमारे, अंबाजी वाघमारे, नितीन वाघमारे, काशिनाथ वाघमारे, अतुल कातकरी, रमेश कातकरी, बंदु मोरे, रवी वाघमारे, सुनील पाटील, अशा वाघमारे, उज्वला वाघमारे, करिना पाटील, रिना पाटील, शामल लहाणे, ज्ञानेश्वर पाटील, संदेश पाटील, रामदास म्हात्रे, निलेश पवार, सतिश पाटील, निवृत्ती शेंदरे, कान्हा शेंदरे, मंगेश गायकवाड, प्रमोद घोगरे, सुमित पाअील, दिगंबर पाटील, हेमंत पाटील, रमेश शेंदरे, शंकर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पनवेल, उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांमध्ये समाधान

| अ.क्र. | गरजेपोटी केलेल्या बांधकामाखालील जमिनीचे क्षेत्र (चौ.मी.) | आकारावयाचा दर (प्रखलित सिडकोच्या राखीव दराच्या (आर.पी.) दराच्या प्रमाणात) |
|---|---|---|
| १ | ० ते २५० | १५% |
| २ | २५१ ते ५०० | २५% |
| ३ | ५०१ पेक्षा अधिक | ३००% (बेस रेट) |

प्रकल्पग्रस्त व त्यांचे सर्व वारस वगळून इतरांचे पात्र अतिक्रमण धारकांनी गरजेपोटी केलेले बांधकामासाठी वरील तक्त्यातील दराच्या दुप्पट दर आकारण्यात यावेत. गरजेपोटी केलेल्या बांधकामाखालील जमीन विहीत नियमानुसार नियमीत करून त्यांना रस्ते आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची तसेच नगर नियोजनाची जबाबदारी संबंधीत नियोजन प्राधिकरणाची राहील.

प्रकल्पग्रस्तांनी/बिगर प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाखालील क्षेत्र व सभोवतालचे अनुलग्न क्षेत्र (Land Appurtenant) विहीत केलेल्या दरानुसार भाडेपट्ट्याद्वारे वाटप करण्यात यावे. तथापि, असे अनुलग्न क्षेत्र वाटप करताना सामाजिक व भौतिक सुविधांसाठी आवश्यक क्षेत्र वगळून वाटप करण्यात यावेत तसेच भविष्यात सामाजिक व भौतिक सुविधांसाठी अतिरिक्त क्षेत्राची आवश्यकता भासल्यास वाटप केलेल्या अनुलग्न क्षेत्रासाठी संबंधीतांना कोणताही मोबदला देण्यात येणार नाही.

भाडेपट्ट्याने देण्यात येणाऱ्या जमिनीवरील बांधकामांना नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारीत) नियमावली, २००८ व एकत्रिकृत नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२०च्या तरतूदी लागू राहील. पूर्वी अस्तित्वात असलेली एकापेक्षा जास्त गरजेपोटी केलेली बांधकामे धोकादायक असल्यास /मोडकळीस आल्याने / सध्या रहिवासीत नसल्याने त्यांना लाभ देणेसाठी प्रकल्पग्रस्ताचे जुने बांधकाम किंवा त्याचे अवशेष जागेवर असल्यास या बांधकामांचे / रहिवासाचे पुरावे सादर केल्यानंतर योजनेचा लाभ देण्यात यावा, परंतु संबंधीत व्यक्ती इतर जागेवर अतिक्रमण करून राहत असेल तर दोन्ही क्षेत्राची बेरीज करुन येणाऱ्या एकूण क्षेत्रास उपरोक्त विहीत केलेले दर आकारुन जमीन भाडेपट्ट्याव्दारे वाटप करण्यात यावी. प्रकल्पग्रस्त अथवा बिगर प्रकल्पग्रस्त यांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामाखालील जमीन नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारीत) नियमावली, २००८ मधील तरतुदीनुसार ६० वर्ष भाडेपट्ट्याद्वारे वाटप करण्यात यावे, मात्र या नियमीत केलेल्या जमिनीवरील बांधकामाचे नियमितकरण/ नियामानुकूल करण्यात आले असे समजण्यात येणार नाही.

नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारीत) नियमावली, २००८ मधील तरतूदी बाधीत होत असल्यास त्या तरतूदींमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून यथावकाश करण्यात येईल. यापुर्वी ज्या प्रकल्पग्रस्तांना १२.५% योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या भूखंडाच्या क्षेत्रामधून अतिक्रमित / गरजेपोटी केलेल्या बांधकामाखालील क्षेत्र वजा करुन उक्त मुद्दा क्र. ८ मध्ये विहीत दराने परिगणीत होणाऱ्या रकमेवर ६५% दर आकारुन त्यांच्या वजा करण्यात आलेल्या क्षेत्राइतका चटईक्षेत्र निर्देशांक मंजूर करण्यात यावा. सदर चटई क्षेत्र निर्देशांक १२.५% अंतर्गत देण्यात आलेला भूखंड किंवा गरजेपोटी नियमीत केलेल्या भूखंडावर वापरता येईल. सदर भूखंडांवर सदर चटई क्षेत्र निर्देशांक वापरता येत नसल्यास सदर चटई क्षेत्र निर्देशांकाचा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) म्हणून वापर एकत्रिकृत नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० (UDCPR) मधील तरतूदींच्या अधिन राहून वापरता येईल.

या निर्णयाद्वारे भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या जमिनीसाठी / क्षेत्रासाठी संबंधीत प्रकल्पग्रस्त क्लस्टर डेव्हलपमेंट स्किम अंतर्गत एकत्रीत अथवा स्वतंत्ररित्या विकास करु शकतील. गरजेपोटी कृती क्षेत्राच्या हद्दीतील गरजेपोटी केलेले बांधकामे सामाजिक सोयीसुविधा, सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि विकास योजना आरक्षण (DP Reservation) यामध्ये मोडत असल्यास रस्ते वगळून अन्य सामाजिक सोयीसुविधा, सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि विकास योजना आरक्षण यांचे शक्यतो पर्यायी जागांवर पुर्नस्थापना करण्यात यावी. गरजेपोटी कृती क्षेत्राच्या हद्दीतील केलेले बांधकाम खालील जमिनीवर मोडत असल्यास भाडेपट्ट्याने वाटपासाठी विचारात घेतले जाणार नाही.

(१) मुख्य रस्ते / शहर पातळीवरील रस्ते पायाभूत सुविधा. (२) ले-आऊटमधील ठरविलेले रस्ते ज्यांच्या आजूबाजूस भूखंड आधीच वाटप केले गेले आहेत. (३) खुल्या जागेचा भूखंड. (४) सर्विस कॉरिडॉर/अंडर ग्राऊंड सर्व्हिस लाईनस् जसे की पाणीपुरवठा, शिवेज वॉटर ड्रेन्स्, गॅस पाईपलाईन, उहरपपशश्र, धारण तलाव, इत्यादी.

सिडकोमार्फत करण्यात येणाऱ्या सव्हेअंती एकत्रित झोपडपट्टी (Slum) असल्यास त्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.

गरजेपोटी केलेली बांधकामे एकत्रिकृत नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील नियम १४.८ नुसार नगर नुतनीकरण (Cluster Development) / पुर्नबांधणीबाबत :- १) शासनाचा नगर नुतनीकरण (Cluster Development)/ पुर्नबांधणी प्रस्ताव हा फक्त गावठाणा अंतर्गत व गावठाणाबाहेरील दाटीवाटीने असणाऱ्या कृतीक्षेत्रापर्यंत प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामांना लागू करण्यात यावा. २) या आदेशातील उपरोक्त मअफमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे जी बांधकामे नियमीत करण्यात येतील असे क्षेत्र / भूखंड /घरे प्रकल्पग्रस्त स्वतंत्ररित्या विकसीत करु शकतील किंवा त्यांना लगतच्या परिसरात असलेल्या नगर नुतनीकरण (Cluster Development) योजनेमध्ये ऐच्छिकरित्या सहभागी होणाचा पर्याय उपलब्ध राहील. ३) एकत्रिकृत नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील नियम १४.८ नुसार नगर नुतनीकरण (Cluster Development) च्या सर्व तरतूदी अशा बांधकामांना लागू राहतील.

## निवडक

### पं. दिनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन



**पनवेल** : महापालिकेच्या मुख्यालयात बुधवारी (दि.२५) पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्ताने आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात केले. या वेळी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### हवालदार रवींद्र कुंभार यांचा सत्कार



**पनवेल** : पनवेल शहर पोलीस ठाण्यात २०१७पासून मुद्देमाल कारकून विभागात कार्यरत असणारे हवालदार रवींद्र कुंभार यांची नुकतीच एपीएमसी पोलीस ठाण्यात बदली झाल्याने त्यांच्या निरोप समारंभाप्रसंगी वपोनि. नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांनी त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या वेळी ठाकरे यांनी त्यांच्या आतापर्यंत केलेल्या कामाचे कौतुक केले. रवींद्र कुंभार यांच्यासह काम केलेल्या अनेक कर्मचारी व अधिकार्यांनी आपल्या त्यांच्या विषयी असलेल्या आपलुकी व प्रेमाच्या भावना या वेळी व्यक्त केल्या.

### मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल** : शहर पोलीस एका मृत व्यक्तीच्या नातेवाईकाचा शोध करीत आहेत. या इसमाचे नाव संजय जशराज पांडे (३५) असे असून रंग गोरा, अंगाने सडपातळ, केस काळे, दाढी मिशी काळी वाढलेली असून, अंगात लाल रंगाचा फुल बाह्याचा टी-शर्ट व ग्रे रंगाची फुल पँट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये जोरदार पावसाची हजेरी

**पनवेल** : गणेशोत्सवादरम्यान विश्रांती घेतलेल्या पावसाने पनवेल परिसरात पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावली आहे. तालुक्यात सोमवारी रात्रीपासून ढगांच्या गडगडाटासह पावसाने बॅटिंग सुरू केली आहे. सोमवारी दिवसभर उष्णतेत वाढ झाल्याने नागरिक हैराण झाले होते. सायंकाळी अचानक वातावरणात बदल होऊन काळोख झाला. यानंतर पावसाने जोरदार सुरुवात केली. यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. पावसाच्या आगमनाने हवेत गारवा निर्माण झाला. काही ठिकाणी थोड्या वेळासाठी वीजपुरवठा खंडित झाला होता, मात्र तो तातडीने पूर्ववत करण्यात आला. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, मंगळवार-बुधवारीही पावसाने आपला जोर कायम ठेवला. त्यामुळे काही प्रमाणात जनजीवन धिम्या गतीने सुरू होते.

# उरण विधानसभेसाठी मविआत रस्सीखेच

## उमेदवारीसाठी शेकाप, ठाकरे गट, काँग्रेसचाही दावा

**उरण : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले असून उरण विधानसभा मतदारसंघात आता महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या ठाकरे गट व शेतकरी कामगार पक्ष यांच्यात रस्सीखेच सुरू झाली आहे.

त्याचप्रमाणे काँग्रेसनेही या ठिकाणी उमेदवारी मिळण्यासाठी दावा केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या नेत्यांसमोर पेच निर्माण झाला आहे. याचा फायदा मात्र भाजपला होणार आहे.

महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाच्या मनोहर भोईर व शेकापच्या प्रितम म्हात्रे हे दोघेही निवडणूक लढविणार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत कोणाला संधी मिळणार याकडे लक्ष लागले आहे. महाविकास आघाडीचे मुख्य घटक असलेल्या ठाकरे गट, शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेस या तिन्ही पक्षांनी दावा केला आहे. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत भाजप समर्थित अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे, तर शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर होती. त्याचप्रमाणे या मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष तिसऱ्या क्रमांकावर होता, मात्र यांच्या मतामधील अंतर कमी होते. त्यामुळे अस्तित्वाच्या या निवडणुकीत या पक्षाकडून दावे केले जात आहेत.

आपण महाविकास आघाडीच्या माध्यमातूनच ही निवडणूक लढविणार असून उमेदवारीसंदर्भात जो निर्णय वरिष्ठ घेतील तो आपल्याला मान्य असेल असे ठाकरे गट म्हणत आहे, तर उरणमध्ये आपल्याला उमेदवारी मिळणार असल्याचे शेकापच्या कार्यकर्त्यांमधून बोलले जात आहे. या दोन्ही पक्षांकडून प्रचारालाही सुरुवात करण्यात आली आहे.

**भाजपला होणार फायदा**

**महाविकास आघाडीतील वाढत्या दावेदारीमुळे भाजपला या निवडणुकीत लाभ होण्याची शक्यता आहे. २०१९च्या निवडणुकीत आमदार महेश बालदी यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवून विजयी झाले आहेत. २०२४च्या निवडणुकीत बालदी हे भाजपचे अधिकृत उमेदवार असणार आहेत. महाविकास आघाडीत सध्या उमेदवारीसाठी चुरस असल्याने दोन उमेदवार उभे राहिल्यास ही निवडणूक भाजपसाठी फायद्याची ठरणार आहे.**

## रोटरी क्लब ऑफ स्टील टाऊनतर्फे रक्तदान शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल रोटरी क्लब ऑफ स्टील टाऊन यांच्या वतीने आयोजित केलेला डीएव्ही पब्लिक स्कूलमध्ये रक्तदान शिबिर कार्यक्रमाला १२७ दात्यांनी रक्तदान केले.

डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांनी या कार्यक्रमाचे व क्लबचे अध्यक्ष मीनाक्षी भटनगर यांचे तोंड भरून कौतुक केले. शिबिरामध्ये लायन्स क्लबच्या वतीने बऱ्याचशा लॉन्सने रक्तदान केले. या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहून यशवंत ठाकरे, बन्सीधर गईरोला, वाय. पी. सिंग, अहुजाजी, सरिता सदरांनी, हरणीशा शेट्टी, जुल्का, श्रेया, जागृती, सरिता यांची प्रमुख उपस्थिती होती. १२७ लोकांनी केलेल्या रक्तदानामुळे क्लबचे अध्यक्ष मीनाक्षी भटनागर यांनी आरएसएस शाखा व रोटरी क्लबचे सर्व अधिकारी पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

प्रत्येक रक्तदात्याला अल्पोहार व भगवद्गीता, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## सीकेटी महाविद्यालयात महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास यावर व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे अर्थशास्त्र विभाग आणि मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२५) स्व. जमनालाल बजाज उपक्रमांतर्गत महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

व्याख्यानासाठी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा येथील कुलगुरू प्रा. डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांना प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर उपस्थित होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी परिषदेच्या विकासासाठी अर्थसहाय्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. त्यांच्या या मताचा विचार करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेला २० लाख रुपये देण्याची घोषणा केली. या रकमेच्या मुदत ठेवीतून मिळणाऱ्या व्याजाद्वारे मातोश्री स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या स्मरणार्थ एक विशेष उपक्रम राबवावा, असे सूचविले.

व्याख्यानास मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय कुंभार यांची विशेष उपस्थिती लाभली.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.एस.के.पाटील यांनी, महाविद्यालयाच्या घडामोडीवर प्रकाश टाकला व अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्रा. के. एन. ढवळे यांनी अर्थशास्त्र विभागाचे विविध उपक्रम आणि प्राप्त केलेल्या यशांबद्दल माहिती दिली. प्रा. डॉ. ज्ञानदेव के. म्हस्के यांनी गांधीजींचे ग्रामीण विकासातील योगदान विविध उदाहरणासह विशद केले, तसेच जमनालाल बजाज यांनी भाषेचा प्रसार, अस्पृशांचा उद्धार व हरिजन सेवक संघ निर्माण केला.

आपल्या उद्योगांमधून समाजाच्या उद्धारासाठी मोलाची देणगी देऊन ग्रामीण आणि शहरी या गांधीजींच्या स्वदेशी विचाराला विशेष प्राधान्य दिले, असे सांगितले. व्याखानाचे आयोजन प्रा. (डॉ.) बाळासाहेब पाटील, अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्रा. के. एन. ढवळे, प्रा. हरिभाऊ खरात, डॉ. काळूराम ढोरे यांनी केले.

महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी प्रियांका घनवट हिची करनिरीक्षक आणि प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल प्रा. डॉ. ज्ञानदेव के. म्हस्के यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाजपचे प्रभाग क्रमांक २०चे बूथ अध्यक्ष संजय जाधव यांना वाढदिवसानमित्त बुधवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते अशोक आंबेकर उपस्थित होते.



**पनवेल : एकात्मता, मानवतावाद आणि अंत्योदयाचे प्रणेते, प्रखर राष्ट्रप्रेमी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. त्यांना जयंतीनिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, शहर सरचिटणीस अमित ओझे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, के. सी. पाटील गुरुजी, सुरेश वास्कर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.**

## लुटमार करणाऱ्या टोळीतील आणखी एकजण गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

दिवसा नोकरी करून रात्रीच्यावेळी महामार्गावर लुटमार करणाऱ्या टोळीतील सहाव्या आरोपीला तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे. त्याच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर ट्रकचालक गेंदलाल पटेल (वय ३५,रा. मध्यप्रदेश) हे थांबले असता अज्ञात पाच ते सात जणांनी त्यांना मारहाण करून दोन मोबाईल व २३ हजार रुपये रोख रक्कम चोरी केली. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. तांत्रिक व गोपनिय माहितीद्वारे एकूण आठ आरोपींची टोळी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यापैकी आरोपी गुड्डु गोपीनाथ नाईक (वय२४), रोहिदास सुरेश पवार (वय २३), आतेश रोहिदास वाघमारे (वय २६) मनिष काळुराम वाघमारे (वय ३५), शंकर चंदर वाघमारे (वय १८) यांना अटक केली.

इतर तीन आरोपींचा शोध सुरू असताना सराईत आरोपी अजय वाघे (२४, रा.महड) हा पनवेलमध्ये लपला असल्याची खबर या पथकाला मिळताच, त्यांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर यापूर्वीसुद्धा खालापूर परिसरात केलेले गुन्हे दाखल आहेत.



**कळंबोली : भाजपच्या मंडल कार्यालयात बुधवारी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## गव्हाण विद्यालयात अवयवदानाबाबत जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये परळ येथील मोहन फाउंडेशनच्या वतीने अवयवदान जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे व मुख्याध्यापक मंडले पी. बी., रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर.एस.भोईर आदींचे कार्यक्रम आयोजनास मार्गदर्शन लाभले.

परळच्या मोहन फाउंडेशन अंतर्गत इ. अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अवयवदान तसेच रक्तदान या विषयाची जनजागृती विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजामध्ये व्हावी या हेतूने मोहन फाउंडेशनचे डॉ. नाथ तसेच प्रार्थना नाथ यांनी विद्यार्थ्यांना अवयवदान याविषयी अनमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख पाटोळे सर, घरत सर, पाटील सर, चौधरी सर, ठाकूर मॅडम, पाटील मॅडम उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक खेडकर सर यांनी केले व आभार पाटील सर यांनी मानले.

## विद्यार्थ्यांनी समाजासाठी सकारात्मक योगदान द्यावे -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी समाजासाठी सकारात्मक योगदान द्यावे, असे आवाहन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. ते जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात बोलत होते.

बीसीटी महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या बीए एलएलबीच्या विद्यार्थ्यांचा ओरिएंटेशन कार्यक्रम आणि स्वागत समारंभ शुक्रवारी यशस्वीरित्या झाला. या या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषविले. यासोबतच भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, डॉ. एस. टी. गडदे यांची उपस्थिती लाभली.




महाविद्यालयाच्या सरचिटणीस (जीएस) प्रेरणा गायकवाड यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाने नवीन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या प्रवासाची सुरुवात केली. अनामिका जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रभारी प्राचार्या सनवी देशमुख यांनी स्वागतपर भाषण केले, तर सहाय्यक प्रा. धनश्री योगेश कदम यांनी बीए. एलएलबी अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या प्रतीक्षेत असलेल्या शैक्षणिक उपक्रमांची विस्तृत ओळख करून दिली.

प्राध्यापक सदस्यांची ओळख करून देण्यात आली आणि महाविद्यालयाच्या विविध समित्यांची रूपरेषा विद्यार्थ्यांना त्या ठिकाणी असलेल्या सपोर्ट सिस्टीम समजून घेण्यात मदत करण्यात आली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना त्यांच्या कायदेशीर शिक्षणात उत्कृष्ट कार्य करण्यास आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्यासाठी प्रेरित केले. कार्यक्रमाची सांगता अपूर्व जाधव यांनी आभार मानून व वंदे मातरम् गायनाने केली.

या अभिमुखतेने विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना महाविद्यालयाची संस्कृती, दृष्टी आणि शैक्षणिक अपेक्षा यांची सखोल माहिती दिली, ज्यामुळे प्रत्येकजण पुढील शैक्षणिक वर्षासाठी उत्साही होता.

## संपादकीय

# परिसरात स्वच्छता हवी

राज्यात यंदा चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये पाच पटींनी वाढ झाल्याचे दिसते आहे. दर पाच वर्षांनी चिकनगुनियाची साथ येते असे निरीक्षण असून यापूर्वीची साथ २०१६ मध्ये नोंदवली गेली होती. यंदा काही रुग्णांमध्ये वेगवेगळी लक्षणे व गुंतागुंतही दिसून आल्यामुळे चिकनगुनियाच्या विषाणूत झालेला बदल तपासण्यासाठी जनुकीय क्रमनिर्धारण करण्याचा निर्णय राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे.

**महाराष्ट्रात मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी चिकनगुनिया आणि डेंग्यूचे रुग्ण वाढले असल्याचे यंदा ऑगस्ट महिन्यातच स्पष्ट झाले. अलीकडच्या काळात चिकनगुनियाच्या रुग्णांची संख्या आणखी वाढली असून रुग्णांमध्ये वेगवेगळी लक्षणे दिसून येत आहेत. काही केसेसमध्ये गंभीर गुंतागुंतही दिसत असल्याने चिकनगुनियाच्या विषाणूत झालेला बदल तपासण्यासाठी जनुकीय क्रमनिर्धारण करण्याचा निर्णय राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था (एनआयव्ही) आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात चिकनगुनियाच्या विषाणूचे जनुकीय क्रमनिर्धारण करण्यात येणार आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी रुग्णालयांची बैठकही आयोजिण्यात आली आहे. चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये यंदा जीवघेणी लक्षणे दिसत असल्याचा दावा काही रुग्णालयांनी केला आहे, परंतु आरोग्य विभागाला मात्र अद्याप तरी वेगळी लक्षणे दिसून आलेली नाहीत असे समजते. नागपूर विभागात ऑगस्ट अखेरीपर्यंत चिकनगुनियाच्या रुग्णांची संख्या ५०० वर पोहचली होती व यातील ३८६ रुग्ण एकट्या नागपूर शहरातले होते. ऑगस्टमध्ये अधुनमधून होत असलेला पाऊस व वाढते ऊन यामुळे डेंग्यूबरोबरच चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे सांगितले जाते. जून-जुलैपर्यंत मुंबईत आवाक्यात असलेल्या चिकनगुनियाच्या रुग्णांची संख्या ऑगस्टमध्ये १६४ वर पोहचली. त्यावेळी राज्यभरातील चिकनगुनियाच्या रुग्णांची संख्या १५१५ वर पोहोचली होती. चिकनगुनिया म्हणजे सर्वसाधारणपणे थंडी वाजून येणारा ताप आणि त्यानंतर काही आठवडे ते काही महिने राहणारी सांधेदुखी असे लक्षणांचे स्वरूप दिसते. पण यंदा चिकनगुनियात एक ते दोन टक्के मुलांमध्ये मेंदूच्या आवरणाला सूज येणे, यकृताचा संसर्ग, अंगावर पुरळ, फिट्स येणे यांसारखी लक्षणे दिसून आल्याचेही सांगितले जाते. गेल्या वर्षीच्या तुलनेत राज्यभरात चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये पाच पट वाढ दिसण्याबरोबरच यंदा बालरुग्णांची संख्याही वाढली आहे तसेच ग्रामीण भागांपेक्षा शहरी भागांमध्ये यंदा चिकनगुनियाचा प्रभाव जास्त आहे. चिकनगुनिया हा विषाणुमुळे होणारा व एडिस इजिप्ती डासामुळे पसरणारा आजार आहे. पाण्याची पिंपे, नारळाच्या करवंट्या व फुलझाडाच्या कुंड्यांमध्ये साचलेलं पाणी यामध्ये साचलेल्या पाण्यात एडिस इजिप्ती डासाच्या अळ्या वाढतात. आठ दिवसांत त्याचे डास तयार होतात. या डासांची अंडी वर्षभर बिनापाण्याची असतात. त्यांना पावसात पाणी मिळाले की त्यांचे डासांमध्ये रूपांतर होते. प्रत्येक डास विषाणूचा वाहक असतो. त्यामुळेच घरात कुठेही पाणी साचले असेल तर लगेच फेकून द्यावे आणि स्वच्छता राखण्याचा सल्ला दिला जातो. डास चावू नयेत याची काळजी घेणे हे या आजाराच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे मानले जाते. संबंधित व्हायरसच्या विरोधात कुठलेही औषध सध्या तरी आपल्याकडे नाही, त्यामुळे लक्षणे कमी करण्यापुरतेच उपचार केले जातात. इतर व्हायरल तापांप्रमाणेच चिकनगुनिया हा आपोआप बरा होणारा आजार मानला जातो. लक्षणांनुसार वेदनाशामक औषधे घेऊन आराम करण्याचा सल्ला दिला जातो. रक्तदाब, डायबेटिस, किडनीचे आजार किंवा हृदयविकार असणाऱ्या रुग्णांना अधिक काळजी घ्यावी लागते.**

# लोहारे व दिवील केटी बंधारे गायब होण्याची शक्यता









पोलादपूर तालुक्यातील अनेक ग्रामस्थांकडून विविध विकासकामांची मागणी केल्यानंतर जुनी विकासकामे भुईसपाट करताना त्यातील काही भाग व अवशेष पुन्हा वापरात आणून नवीन कामांमध्ये बेमालूमपणे वापरणाऱ्या बांधकाम व्यावसायिक आणि ठेकेदारांसाठी तालुक्यातील काही भंगार आणि अवशेष (डेब्रिज) चोरांकडून बिल्डींग मटेरियल सप्लाय करण्याचे सौहार्दपूर्ण सहकार्य केले जात असते. याचाच भाग म्हणून दिवील आणि लोहारे येथील केटी बंधारे पोलादपूरच्या उत्तरवाहिनी सावित्री नदीला येणाऱ्या पुराला कारणीभूत ठरवून भुईसपाट करण्याची मागणी दोन महिन्यांपूर्वी भंगार व अवशेष चोरांच्या सूचनेवरून शासनअमान्य डिजिटल माध्यमांकडून करण्यात आली होती.

दिविल आणि लोहारमाळ येथे तब्बल ३५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या दोन कोल्हापुरी तंत्राच्या बंधाऱ्यांपैकी दिविलचा बंधारा जीर्ण झाला असताना २००५च्या अतिवृष्टीमुळे आलेल्या उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या महापुरामध्ये वाहून गेला तर लोहारमाळच्या बंधाऱ्याला नदीच्या पात्रात वाहून आलेल्या झाडांच्या खोडांचे हादरे बसून तो कमकुवत झाला. त्यानंतर काही काळाने बंधाऱ्याची डागडुजी करताना हिवाळी आणि उन्हाळी या बंधाऱ्याखालून नदीच्या उथळ पात्रातून एस.टी.च्या गाडयांसह अन्य प्रकारची वाहतूक सुरू झाली. हे काम संपल्यानंतर आजमितीस बंधाऱ्यावरून वाहतूक सुरू राहिली असून या बंधाऱ्यावरून एस.टी.ची गाडी अथवा लाकडाचे ओंडके भरलेले ट्रक जाऊ लागले की हा बंधारा थरथरत असल्याचा थरारक अनुभव अन्य वाहनांतील प्रवाशांसह बंधाऱ्यावरून चालत जाणाऱ्या पादचाऱ्यांनाही घ्यावा लागत असे. यापैकी लोहारे येथील केटी बंधाऱ्यालगत लोहारे तुर्भे पुलाचे बांधकाम होऊन तो कार्यान्वितही झाला आहे, मात्र दिविल येथील केटी बंधारा २००५ साली अतिवृष्टी व महापूराच्या काळात फुटला आणि नादुरूस्त झाल्याने वाहतुकीस व रहदारीस अयोग्य ठरला आहे.

पोलादपूर शहरालगतच्या चरई गावापर्यंत पुर्वी होडीने प्रवासी वाहतूक केली जात असताना उन्हाळी सावित्री नदीच्या उथळ पात्रातून पायपीट करून चरईपर्यंत ये-जा केली जात असे. यानंतर तत्कालीन रायगडचे पालकमंत्री प्रभाकर मोरे यांनी चरई येथे जाण्यासाठी पुलाची मंजूरी आणून पुल साकारली. या पुलाच्या दोन्ही बाजूच्या ॲप्रोच रोडसाठी करण्यात आलेल्या भरावामुळे पोलादपूर शहरालगत वाहणारी उत्तरवाहिनी सावित्री नदीचे पात्र दुथडी भरून वाहू लागल्यानंतर या भरावावर आदळून पोलादपूर शहरातील उत्तरेकडील लोकवस्ती तसेच जुन्या महाबळेश्वर रस्त्यावर पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होत असे. गेल्या काही वर्षांमध्ये २००५ साली तसेच २०२१ साली या चरई पुलाच्या चरई गावालगतच्या ॲप्रोच रोडचा भराव वाहून गेल्याने दोनवेळा ॲप्रोच रस्त्याचे बांधकामदेखील करण्यात आले, मात्र गेल्या तीन वर्षांपुवी पोलादपूर तालुक्यातील काँक्रीटचे रस्ते, लोखंडी पुल, खडी व लालमाती तसेच इमारतीचे अवशेष यांचा वापर सर्रास सरकारी विकास कामांमध्ये करणाऱ्यांनी काही महिन्यांपासून दिवील आणि लोहारे येथील कोल्हापुरी तंत्राच्या म्हणजेच केटी बंधाऱ्यांमुळे पोलादपूर शहरात पुरस्थिती निर्माण होत असल्याच्या चर्चा घडविल्या, मात्र प्रत्यक्षात या दोन्ही केटी बंधाऱ्यांवरून उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पुराचे पाणी वाहात असल्याने हे दोन्ही बंधारे पोलादपूर शहरातील पुरास कारणीभूत नसल्याचे उघड आहे.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

लोहारमाळ गावाच्या हद्दीतील कोल्हापुरी तंत्राच्या बंधाऱ्याचा उपयोग सध्या तुर्भे खोंडा, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, वझरवाडी, दिविल आणि हावरे भागात जाण्यासाठी तेथील ग्रामस्थ करीत असताना त्याठिकाणी नवीन लोहारे तुर्भे पुल उभारण्यात आला. या पुलाच्या उत्तरेला पुर्वीचा केटी बंधारा आहे. त्यामुळे पोलादपूर चरई पुलानंतर लोहारेतील नवीन पुल आणि त्यानंतर लोहारे केटी बंधारा तसेच तेथून दोन कि.मी अंतरावर दिविल येथील केटी बंधारा असल्याने या पुलांमुळे पोलादपूर शहरातील पुरस्थिती कशी निर्माण होईल, असा सवाल तालुक्यातील सूज्ञ जनतेला सतावू लागला असताना या केटी बंधाऱ्यांना चांगल्या दर्जाचे तोडीचे ताशीव दगड असून ते दगडी इमारत आणि लोडबेअरिंग जोत्याच्या बांधकामांना उपयुक्त असल्याने दोन्ही केटी बंधारे पोलादपूरच्या पुरस्थितीला कारणीभूत असल्याची चर्चा घडवून नजिकच्या काळात दोन्ही केटी बंधारे पाडून परस्पर त्यांची वासलात लावण्याचा डाव भंगार व अवशेषांचा विकास कामे आणि भरावासाठी वापर करणाऱ्यांकडून होणार असल्याचे संकेत काही बांधकाम व्यावसायिकांकडून देण्यात येत आहेत.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथे केटी बंधाऱ्यासंदर्भातील कार्यालय गेल्या अनेक वर्षांपासून बंद झाले असून दिवील आणि लोहारे या दोन्ही बंधाऱ्यांची देखभाल दुरूस्ती तसेच जबाबदारी रामभरोसे झाली आहे. यामुळे हे दोन्ही केटी बंधारे रातोरात गायब करण्यात येण्याची शक्यताही तालुक्यात व्यक्त होत आहे. दरम्यान, पोलादपूर शहरातील लोखंडी साकव तसेच तालुक्यातील अनेक भागातील जीर्ण लोखंडी साकव तसेच काँक्रीटचे रस्तेदेखील अवशेष (डेब्रिज) चोरांनी रातोरात गायब करून ते अवशेष अन्यत्र वापरल्याच्या घटनांचे सातत्य पाहता दिवील आणि लोहारे या दोन्ही बंधारे अचानक गायब झाल्यानंतर त्याबाबत चर्चा करणे व्यर्थ ठरणार आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# आता जाहिरातमुक्त यूट्यूब व्हिडीओ पाहा

युट्यूबवर एखादा व्हिडीओ बघता सतत ॲड येतात. त्यामुळे चिडचिड होतेच, पण जबरदस्ती का होईना ती ॲड पाहावीच लागते, परंतु आता यूट्यूबने त्यांच्या प्लॅटफॉर्मवर ॲड फ्री कन्टेन्ट आणण्यासाठी 'पॉज ॲड्स' फीचर्स रोल आउटची करण्याची घोषणा केली आहे.




द व्हर्जने अहवाल दिल्याप्रमाणे यूट्यूबचे कम्युनिकेशन मॅनेजर असलेल्या ओलुवा फालोदुन यांनी या खास फीचरची घोषणा केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार फालोदुन यांनी सांगितले की, अनेक जाहिरातदारांनी या फीचरमध्ये रस दाखविला आहे. त्यामुळे युजर्सची वाढती संख्या पाहता व्हिडीओ शेअरिंग प्लॅटफॉर्मने हे फीचर जागतिक स्तरावर आणण्याचा निर्णय घेतला आहे.

२०२३च्या सुरुवातीला 'पॉज ॲड्स' फीचर जाहिरातदारांसाठी सादर करण्यात आले होते. नंतर हे फीचर अनेक प्रेक्षकांनी स्वीकारले, ज्यामुळे कंपनीने जागतिक स्तरावर रोल आउट सुरू केले. हे फीचर युजर्सच्या आवडी-निवडीला प्राधान्ये देतात, युजर्स ॲक्टिव्ह आहेत की इनटिव्ह आहेत हेसुद्धा समजून घेतात.

याव्यतिरिक्त यूट्यूबने दावा केला आहे की, हे नवीन फीचर तुम्हाला कमी व्यत्यय आणणारा अनुभव प्रदान करण्याच्या उद्देशाने तयार केले गेले आहे. काही वर्षांपासून यूट्यूब 'अनस्किपेबल ॲड्स' आणण्याचा सातत्याने सतत प्रयत्न करीत आहे. ब्रॅण्डेड क्यूआर कोडपासून ते अगदी पिक्चर-इन-पिक्चर जाहिरातींपर्यंत यूट्यूबने या समस्येवर अनेक उपाय शोधून काढले. त्यामुळे 'पॉज ॲड्स' ही या प्रयोगांमधील नवीन भर आहे, असे आपण म्हणू शकतो.


यात एक ट्विस्ट आहे. जर या फीचरचा उपयोग करायचा असेल, तर तुम्हाला यूट्यूब प्रीमियम घ्यावे लागेल. आतापर्यंत 'पॉज जाहिराती' फक्त यूट्यूब प्रीमियम युजर्ससाठी उपलब्ध असणार आहेत. भारतातील यूट्यूब प्रीमियमच्या वैयक्तिक प्लॅनची किंमत १४९ रुपये आणि कौटुंबिक प्लॅनची किंमत प्रतिमहिना २९९ रुपये आहे. तुम्ही विद्यार्थी असाल, तर प्रतिमहिना ८९ रुपयांमध्ये हा प्लॅन मिळेल तसेच जर नवीन युजर्स असाल, तर तुम्हाला यूट्यूब प्रीमियम काही दिवसांसाठी मोफत मिळू शकेल. १,४९० रुपयांचा वार्षिक वैयक्तिक प्लॅन, ४५९ रुपयांचा क्वार्टली प्लॅन व १५९ रुपयांचा मासिक प्रीपेड प्लॅन, असे प्रीपेड पर्याय युजर्ससाठीदेखील आहेत.

# थोर समाजसुधारक पं. ईश्वरचंद्र विद्यासागर

महान समाजसुधारक आणि बंगालच्या पुनर्जागरणातील एक प्रमुख व्यक्तिमत्व म्हणून पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज जयंती.

पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा जन्म २६ सप्टेंबर १८२० रोजी ठाकूरदास बंदोपाध्याय आणि भगवती देवी यांच्या पोटी बंगाल प्रेसिडेन्सीच्या बिरसिंघा गावात झाला. लहानपणी ते हुशार विद्यार्थी होते आणि त्यांना ज्ञानाची तीव्र तहान होती. त्यांनी कलकत्ता येथील संस्कृत महाविद्यालयात शिक्षण घेतले आणि कायद्याची परीक्षाही उत्तीर्ण केली. १८४१मध्ये ते फोर्ट विल्यम कॉलेजमध्ये २१व्या वर्षी संस्कृत विभागाचे प्रमुख म्हणून रुजू झाले. ते संस्कृत, हिंदी, बंगाली आणि इंग्रजीचे विद्वान विद्वान होते. शिक्षक असण्याबरोबरच ते अनुवादक, लेखक, तत्त्वज्ञ, उद्योजक आणि परोपकारी देखील होते. त्यांनी 'बोर्नो पोरीचॉय' लिहिले, जे आजही भाषेच्या नवशिक्यांना बंगाली वर्णमाला शिकवण्यासाठी वापरले जाते. बंगाली अक्षरे लिहिण्याच्या आणि शिकवण्याच्या पद्धतीत त्यांनी क्रांती केली.

एक शिक्षक या नात्याने विद्यासागर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान शिकण्यासाठी आणि दोन्हीपैकी सर्वोत्तम तत्त्वज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. त्यांनी सर्वांसाठी संस्कृत महाविद्यालयाचे दरवाजे उघडले.



**निमित्त**

प्रवेश शुल्क आणि शिक्षण शुल्क या संकल्पना मांडणारे ते बंगालमधील पहिले व्यक्ती होते. अध्यापनाच्या दर्जात आणि पद्धतींमध्ये एकसमानता यावी म्हणून त्यांनी शिक्षक प्रशिक्षण विद्यालयाची स्थापना केली. ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते ही होते. ज्या महाविद्यालयातून त्यांनी पदवी घेतली त्या महाविद्यालयातील चमकदार कामगिरीमुळे त्यांना संस्कृत महाविद्यालयातून 'विद्यासागर' ही पदवी मिळाली. विद्यासागरचा शब्दशः अर्थ 'ज्ञानाचा सागर' असा होतो.

बंगालमधील शिक्षणाचया आधुनिकीकरणाच्या कार्यासोबतच त्यांनी महिलांच्या हिताचे कामही केले. विधवांवर कठोर निर्बंध लादणाऱ्या सनातनी व्यवस्थेविरुद्ध त्यांनी लढा दिला. विधवांना त्यांचे डोके मुंडणे आणि सर्व वेळ पांढरे कपडे घालणे आवश्यक होते. त्यांना त्यांच्या घराबाहेरही फिरण्याची परवानगी नव्हती आणि त्यांना कठोर घरगुती कामगार आणि अर्ध-उपाशी जीवन जगावे लागले. विद्यासागर यांना या अन्यायाचा राग आला आणि त्यांनी विधवा पुनर्विवाहाची बाजू मांडली, ज्याला त्या वेळी परवानगी नव्हती. १८५६मध्ये हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा पास करण्यासाठी त्यांनी ब्रिटीश अधिकाऱ्यांवर दबाव आणला. तो ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत पास झाला.

विद्यासागर यांना समाजातील सनातनी घटकांनी जवळजवळ पाखंडी म्हणून पाहिले होते, मात्र त्यांनी अनेक मासिके आणि प्रकाशनांद्वारे त्यांची मते आणि मतांचे समर्थन करणे सुरू ठेवले.

वयाच्या १४व्या वर्षी (त्यावेळच्या प्रथेप्रमाणे) दिनमणी देवीशी त्यांचा विवाह झाला. या जोडप्याला नारायण चंद्र हा मुलगा होता. विद्यासागर यांनी आपल्या मुलाचे लग्न एका विधवेशी लावले. त्यांनी बेताल पंचबिंसती, बोर्नो पोरीचॉय, बंगला-र इतिहास, उपक्रमणिका इत्यादी अनेक पुस्तके लिहिली. त्यांनी शोम प्रकाश हे बंगाली वृत्तपत्रही सुरू केले. जुलै १८९१मध्ये वयाच्या ७०व्या वर्षी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**




अलिबाग : रायगड जिल्ह्यात यावर्षी समाधानकारक पाऊस पडला आहे. जिल्ह्यातील अनेक धरणे भरली आहेत.

## आरोग्य प्रहर

# घरच्या घरी अशा करा कॅलरीज बर्न

चालणे हा ताण कमी करण्याचा उत्तम मार्ग आहे. चालणे हा एक व्यायामाचा उत्तम प्रकार मानला जातो, ज्यामुळे शरीराला असंख्य फायदे मिळतात. रोजच्या चालण्यामध्ये सातत्य ठेवल्याने मानसिक स्वास्थ्यदेखील सुधारते. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पायी चालण्यासाठी तुम्हाला निश्चित अशी वेळ ठरवण्याची काहीच गरज पडत नाही. दरम्यान, चालताना तुम्ही दररोज किती पावले टाकली पाहिजेत आणि चालताना कोणत्या प्रकारचे पाऊल उचलले पाहिजे तसेच त्याचे अनेक फायदे आज आपण जाणून घेऊयात.




जे लोक वर्क फ्रॉम होम करतात तसेच पावसाळ्यात ज्यांना घराबाहेर पडता येत नाही अशा लोकांनी घरातच कशा प्रकारे चालले पाहिजे या संदर्भात बंगळुरूमधील स्टर व्हाईटफिल्ड हॉस्पिटलचे मुख्य फिजिओथेरपिस्ट डॉ. राजाराम एम यांनी माहिती दिली आहे. जर तुम्ही रोज फिरायला जाऊ शकत नसाल, पण तुम्हाला चालायचा व्यायाम करायचा असेल आणि वजन कमी करायचे असेल तर तुम्ही हा वर्कआउट करून पाहा.

३० सेकंदांसाठी उभे राहून पाय लांब करणे, ३० सेकंद एका जागेवर उड्या मारणे, ३० सेकंद पायाच्या बोटांवर उभं राहून गुडघे उंच करा, खाली वाकणे पुन्हा वर येणे. ३० सेकंद एकाच जागेवर हळू हळू धावा, एकदा उजव्या बाजूला एकदा डाव्या बाजूला खाली वाका. अशा प्रकारचा व्यायाम तुम्ही घरबसल्या करू शकता. प्रत्येक व्यायाम १० फेऱ्यांसाठी पुन्हा करा. यामुळे तुम्ही सहज कॅलरी बर्न करू शकता.

अशा प्रकारचे साधे व्यायाम किंवा हालचाली सक्रिय होण्यासाठी एक चांगली सुरुवात आहे, परंतु हे समजून घ्या की साधे व्यायाम कठीण वर्कआउटची जागा घेऊ शकत नाहीत. शारीरिक तंदुरुस्तीसारखी दीर्घकालीन आरोग्य उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समतोल राखणे आवश्यक आहे. डॉ. राजाराम यांच्या मते, यांसारख्या छोट्या छोट्या आणि साध्या व्यायामाचा फायदा होऊ शकतो, मात्र निरोगी जीवन जगण्यासाठी शरीराला अधिक चांगल्या प्रकारच्या वर्कआउट्सची गरज असते.

आरोग्य तंदुरुस्त ठेवण्यासाठी चालणे चांगले आहे. यामुळे तुमचे शरीर सक्रिय राहते आणि अन्नाचे पचन व्यवस्थित होते, ज्यांना मधुमेह आहे त्यांनी रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी सतत चालावे. ताणतणाव, चिंता, झोप न लागणे, एकाग्रता नसणे इत्यादी गोष्टी यामुळे दूर होतात. चालण्याने रक्तदाब नियंत्रित राहतो व डोळ्यांसाठीही हे फायदेशीर आहे.

# पेण डेपोमधील स्वच्छतागृहाची दुरवस्था

## प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी



**पेण : प्रतिनिधी**

पेण येथील एसटी स्थानकातील स्वच्छतागृह धोकादायक बनले असून ते कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती आहे. तातडीने हे स्वच्छतागृह बंद करण्याची मागणी होत आहे.

आगार व्यवस्थापक याकडे लवकरात लवकर लक्ष द्यावे, अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यास प्रवाशांचा जीव धोक्यात येऊ शकतो, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

एसटी स्थानकामध्ये एकच स्वच्छतागृह आहे. या ठिकाणी शौचालय आणि मुतारीची व्यवस्था आहे, मात्र स्वच्छतागृहाचे बांधकाम धोकादायक स्थितीत आहे. गेल्या दहा वर्षांत या स्वच्छतागृहाची डागडुजी न केल्याने त्याच्या भिंती निखळल्या आहेत, पत्रे तुटलेले आहेत. नियमित साफसफाई होत नसल्याने स्वच्छतागृहात जाताना नाक मुठीत घेऊन जावे लागते. दुर्गंधीमुळे प्रवासी हैराण झाले आहेत. काही दिवसांपूर्वी एसटी स्थानकावर लावत असताना चालकाचा अंदाज चुकल्याने एसटीने मुतारीला धडक दिली. त्यामुळे मुतारीचा काही भाग कोसळला आहे. तरीही आगार व्यवस्थापक याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. एखादी दुर्घटना घडली तर प्रवाशांच्या जीवावर बेतू शकते.

एसटी स्थानकात रोज हजारो प्रवासी प्रवास करतात यामध्ये जेष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांचही मोठी संख्या आहे. एसटीने प्रवास करीत असताना अनेक प्रवाशी मुतारीचा वापर करतात. स्थानकातील प्लॅटफॉर्मची उंची वाढवल्याने ही मुतारी खड्ड्यात गेली आहे. स्थानकाची उंची दीड फूट वाढल्याने मुतारी दीड फूट खड्ड्यात गेली आहे.

**अनेक ज्येष्ठ नागरिकांना गुढग्यांचा आजार असल्याने त्यांना या मुतारीचा वापर करताना अक्षरशः कसरत करावी लागते. त्यातच एसटी चालकाने मुतारीला धडक दिल्याने मुतारीचा एक भाग कधीही कोसळून अपघात घडू शकतो. त्यामुळे तातडीने नवीन स्वच्छतागृह बांधावे.**

**–बंडू खंडागळे,**
**गुरव समाज महासंघ**

## परतीच्या पावसाचा रायगडात जोर

**अलिबाग :** हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार रायगडात पावसाने जोरदार हजेरी लावली होती. नदी नाले आणि धबधबे भरभरून वाहत होते. अनेक भागात विजेच्या कडकडाटासह मोठा पाऊस झाला. यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली.

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
**BHGAUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW**
Plot No-4, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W) 410206.

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POST FOR THE ACADEMIC YEAR 2024-2025. (FOR SELF FINANCE PROGRAMME)**

**Full time Assistant – Professor for the Academic Year – 2024-2025 On Purely Temporary for one year basis for the following subjects.**

| SECTION / SUBJECTS | TITLE OF POST | QUALIFICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|
| B.A.L.L.B. (5 Yrs. Course) (UG COURSE) | ASST. PROFESSOR | LLM. & Ph.D (LAW) or NET / SET | 01 |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA,** at BHAGUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW Plot No- 04, Sector-11, Khanda Colony New Panvel(W) Dist : Raigad. Navi Mumbai – 410206, on or before **07/10/2024 (Monday).**
Candidates may submit the application by email to
**bcthakurcollegeoflaw@gmail.com.**
If required Contact :- **1. Mrs. Saylee Patankar - 9930718675**
**2. MR. Ujjawal Patil : 9004401961.**
**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel.

# अनाथ आश्रमातील मुलींना कपडे आणि खाऊचे वाटप



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान भाजप शक्ती केंद्र प्रमुख दानशूर व्यक्तीमत्त्व असलेले येथील व्यावसायिक दीपक शाह आणि बंधू नितीन शाह यांच्या माध्यमातून नेरळ जवळील धामोते येथे असलेल्या अनाथ मुलींच्या आश्रमात कपडे आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

नेरळ–कळंब रस्त्यावर आगरी समाज हॉलच्या समोर आसरा अनाथ मुलींचे आश्रम आहे. या ठिकाणी समाजातील अनाथ मुलींचा सांभाळ करून त्यांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम आसरा अनाथाश्रम करीत असते. याच अनाथ आश्रममध्ये राहणाऱ्या मुलींसाठी माथेरान भारतीय जनता पार्टीचे शक्ती केंद्र प्रमुख दानशूर व्यक्तीमहत्व असलेले व्यावसायिक दीपक शहा आणि त्यांचे बंधू नितीन शहा यांच्या माध्यमातून कपडे आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

या वेळी आसरा अनाथाश्रम मधुची व्यवस्थापिका सुवर्णा पिंगळे तसेच माथेरान येथील शिक्षक संघपाल वाठोरे आदी उपस्थित होते.

# मोरे महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशनचे धाटाव येथील कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयाच्या 'राष्ट्रीय सेवा योजना विभागा (एनएसएस) तर्फे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला.

एम. बी. मोरे फाउंडेशन सामाजिक सेवा संस्थेचे संचालक अशोक मोरे यांच्या हस्ते एनएनएस ध्वजारोहण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा प्रसन्न म्हसळकर, एनएसएस विभाग प्रमुख प्रा मयुर पाखर, सहाय्यक प्रा ममता बींद, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि ७९ स्वयंसेवीका उपस्थित होत्या.



JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
**CHAGU KANA THAKUR VIDYALAYA**
Plot no. 8 Sector- 14, New Panvel, Dist: Raigad – 410206.

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POST FOR THE ACADEMIC YEAR 2024-2025**

**Full time Assistant – Teacher for the Academic Year – 2024-2025. On Purely Temporary for one year basis for the following subjects.**

| Name Of The Schools | Title of Posts | Subject / Section | Qualifications | No of Posts |
|---|---|---|---|---|
| Chagu Kana Thakur Vidyalaya English Medium Secondary Section | Asst. Teacher | Mathematics | B.sc./ M.sc. B.ed. (Maths/ Physics) | 01 |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach with attested xerox copies of certificates to CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no: 8, Sector-14, New Panvel.Tal: Panvel. Dist: Raigad. Navi Mumbai. 410206.
Candidates may submit the application by email to **jbspsanstha1992@gmail.com** or by post on or before **07/10/2024 (Monday).**
If required **Contact No. 9930718675. MRS. PATANKAR SAYLEE.**
**Shri. Ramsheth Thakur (Ex.M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel.

# विद्युत समस्या सोडविण्यासाठी आमदार डावखरे सकारात्मक



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

कर्जत तालुक्यातील विद्युत समस्या सोडविण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे कोकण पदवीधरचे आमदार निरंजन डावखरे यांनी पाठपुरावा केला आहे. यासंदर्भात त्यांनी बैठकही घेतली.

कर्जत तालुक्यातील विविध विद्युत समस्यांसाठी मोठे जन आंदोलन उभे राहिले होते. या आंदोलनामध्ये आठ दिवसाचे साखळी उपोषणसुद्धा झाले. त्यानंतर अनेक पक्षाच्या मान्यवर नेते यांनी आश्वासने दिली, परंतु कोणीही फॉलोअप केला नाही परंतु भारतीय जनता पक्षाचे कोकण पदवीधरचे आमदार निरंजन डावखरे यांनी पाठपुरावा करून एमएसईबी अधिकाऱ्यांबरोबर ठाणे येथील एमएसईबीच्यामुख्य कार्यालयात अधिकाऱ्यांची बैठक लावली होती

यामध्ये अनेक प्रश्न तडीस लावण्यासाठी त्यांनी विविध स्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन देऊन अधिकाऱ्यांना शक्य असलेली कामे त्वरित सुरू करण्यासाठी सूचना दिल्या याबद्दल आमदार निरंजन डावखरे आणि भारतीय जनता पक्षाचे संघर्ष समितीने मनापासून आभार मानले आहेत.

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**
**शहर अभियंता विभाग**
**ई–निविदा सुचना**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईटः www.panvelcorporation.com
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. ४७८/४८०/२०२४ दि. २५/०९/२०२४

**आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निमशासकीय (Central Government, State Government, Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी–१ शतमान पध्दतीनुसार ई–निविदा मागवीत आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/१५३/ २०२४–२०२५ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अं. भु.क्र.१२५/१ च्या समोरील रस्त्याच्या साईटपट्टी मध्ये कॉंक्रिटीकरण करणे. | १४,७९,४६९/– |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर **दि. २६/०९/२०२४** रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
अतिरिक्त आयुक्त I
पनवेल महानगरपालिका

# कर्जत येथे रिक्षाला ट्रकची धडक



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील रिलायन्स पेट्रोल पंप येथे प्रवाशी रिक्षा उभी असताना मुरबाडकडून कर्जत पनवेलकडे जाणाऱ्या ट्रकने प्रवासी रिक्षाला पाठीमागून धडक दिली.

या धडकेत रिक्षाचे पाठीमागील भाग चेम्बुन गेला असून पुढील काचादेखील फुटल्या आहेत. याबाबत रिक्षाचालक ज्ञानेश्वर आगज यांनी कर्जत पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंद केली आहे.

कर्जत तालुक्यातील पोटल येथील रिक्षाचालक ज्ञानेश्वर आगज हे रिक्षकाचालक आपली प्रवासी रिक्षा (एमएच ४६ बीपी १०४८) घेऊन प्रवाशांची वाट पाहत होते. कर्जत शहरातील रिलायन्स पेट्रोल पंप येथे त्यांची रिक्षा उभी होती आणि या रिक्षाला पाठीमागून मुरबाड कडून आलेला ट्रक याने पाठीमागून धडक दिली. रिक्षाचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात कोणत्याही व्यक्तीला गंभीर जखमा झाल्या नाहीत, मात्र या अपघातात प्रवासी रिक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे रिक्षा चालक ज्ञानेश्वर आगज यांनी कर्जत पोलीस ठाणे गाठून आपल्या रिक्षाच्या नुकसानीबद्दल तक्रार दाखल केली आहे.

**महाराष्ट्र शासन**
**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड**
**जिल्हा रायगड ४०२३०१**
**Email:-rpdmahad.ee@mahapwd.com Ph. No.** 02145 222243
**NOTICE INVITING e-TENDER**
**Notice No. 10 for 2024-25**

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडुन बी–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग, महाड, यांनी राखून ठेवला आहे.

| ई- निविदा काम क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई–निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे पाचाड येथील पोलीस चौकीच्या परिसराचा विकास करणे. ता. महाड. जि. रायगड | ९९२००३५.०० | १०००००.०० | ०६ महिने | ११८०.०० | वर्ग ४ अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२४/०९/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०१/१०/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. ०३.१०.२०२४ वेळ ११.०० पासून |

**टिपः–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

**रा.कि. सेल/माप्रवि/महाड/निविदा/४८०**
**दिनांक : २३/०९/२०२४**

**सही/**
**(सलोनी स. निकम)**
**कार्यकारी अभियंता**
**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड**

**विमाका/कोवि/२०२४–२०२५/८९**

# आमदार गोगावले यांचे अभिनंदन



**चौक :** आमदार भरत गोगावले यांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष पदी निवड झाल्याने त्यांचे राजू चौधरी यांनी अभिनंदन केले.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक ३९/२०२४-२०२५ (मुंबई)
म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रोहा औद्योगिक क्षेत्र.. रोहा औद्योगिक क्षेत्राला जोडलेल्या इमर्जन्सी एस्केप रोड आणि धाटाव, महादेववाडी, वाशी व लांडर गावातील नव्याने विकसित झालेल्या अंतर्गत रस्त्यांवर पथदिवे बसविणे. | ₹ १,४२,९४,८५६.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...नवीन केटी विअरपर्यंत खराब झालेल्या मार्गाची दुरुस्ती करणे. | ₹ १६,२४,६७५.०० |
| ३ | तळोजा औद्योगिक क्षेत्र... तळोजा पाणीपुरवठा योजनेची ... एक वर्षाच्या कालावधीसाठी वितरण प्रणाली आणि तळोजा फीडरच्या मुख्य लाईनमधील गळती शोधून काढण्यासाठी मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री प्रदान करणे. | ₹ ३९,६७,५५९.०० |
| ४ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड येथील नवीन केटी विअर मधील नवीन स्ट्रेट प्रकारच्या निडल्स तयार करणे, खराब झालेल्या जुन्या वक्र प्रकारच्या निडल्सची दुरूस्ती करून रंग लावणे. | ₹ २८,१८,९४३.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेच्या एचडीपीई व पीएससी सांडपाणी वाहिनीच्या खराब झालेल्या जॉइंट्सची गळती ईपीडीएम सीलिंग कंपाउंड वापरून ऑनलाइन सीलिंग पद्धतीद्वारे रोखणे (वर्ष २०२४-२०२५ साठी) | ₹ ४०,०२,३८४.०० |
| ६ | पनवेल खांदा कॉलनी येथील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरुस्ती...... खांदा कॉलनी प्रशासकीय इमारत येथे लिफ्टचा पुरवठा करून, बसविणे व कार्यान्वित करणे. | ₹ २३,२०,०५४.०० |
| ७ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरातील कोसळलेल्या कंपाउंड भिंतीची दुरुस्ती करणे. | ₹ ४०,०३,५०१.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २६/०९/२०२४ ते दिनांक ०४/१०/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २७/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०१/१०/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### दीनदयाळ उपाध्याय यांना अभिवादन

**नवी मुंबई :** थोर समाजसुधारक व विचारवंत पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील म्फीथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करून भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, विलास मलुष्टे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. समाजातील अंतिम व्यक्तीच्या विकासाचे ध्येय नजरेसमोर ठेवून त्यादृष्टीने वाटचाल करण्याची प्रेरणा पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या चरित्रापासून मिळते त्यामुळे त्यांचा जयंती दिन अंत्योदय दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

### नामदेव ठाकूर यांना पुरस्कार

**उरण :** तालुक्यातील कंठवळी गावातील सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर यांना अमरदीप बाल विकास फाऊंडेशन महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था पनवेलकडून राज्यस्तरीय कर्तुत्व गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कंठवली या लहानशा गावात जन्मलेल्या नामदेव ठाकूर यांनी समाजसेवेचा वसा आपले आईवडील व जेष्ठ बंधू बी.एम .ठाकूर यांच्या कडून अंगीकारला आहे. नामदेव ठाकूर यांनी आदिवासी बांधवांना शासकीय योजना मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पत्रव्यवहार करून पुढाकार घेतला, त्यांना जातीचे दाखले, रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड, घरकुल बचत गटाचे महत्त्व यामध्ये उल्लेखनीय काम केले आहे.



# नवी मुंबईकर हस्तांतरण शुल्कापासून होणार मुक्त

## सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांनी दिले आश्वासन; बोर्ड मीटिंगमध्ये विषय घेणार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील हस्तांतरण शुल्क बंद करण्याबाबत शहरात चळवळ उभी राहिली आहे. मुख्यमंत्र्यांनी सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांना दिलेल्या आदेशानुसार त्यांनी नवी मुंबईतील हस्तांतरण शुल्क बंद करण्याबाबत बोर्ड मीटिंगमध्ये विषय घेणार आहेत.

नवी मुंबई, पनवेलमधील हजारो सोसायट्यांनी या चळवळीला पाठिंबा दर्शविला आहे. समितीने याप्रकरणी वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट घेत मुख्यमंत्र्यांकडे हा विषय मांडला होता. मुख्यमंत्र्यांनी लाखो नागरीकांना याचा मिळणार लाभ लक्षात घेत या प्रश्नाची दखल घेत सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांना हा प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मंगळवारी संजय शिरसाट यांनी समिती



सोबत बैठक घेत येत्या आठ दिवसांत हा प्रश्न बोर्डात मांडून सोडविण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे सिडको क्षेत्रातील नागरिकांवर वर्षानुवर्षे लादले जाणारे हस्तांतरण शुल्क घेणे बंद होणार आहे.

सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांनी सिडको भवन येथे नवी मुंबई सिटीजन्स फाऊंडेशन, नवी मुंबई सोसायटी फेडरेशन व सहकारभारतीचे पदाधिकारी यांच्यासोबत बैठक घेतली. या वेळी शिवसेनेचे उपनेते विजय नाहटादेखील उपस्थित होते. या वेळी शिरसाट म्हणाले की, सिडकोच्या उच्च पदस्थ अधिकारी वर्गासोबत ट्रान्सफर चार्जेस रद्द करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा पुर्ण झाली आहे. पुढील आठ दिवसांत या विषयाचा प्रस्ताव तयार होईल. सिडकोच्या संचालक मंडळात संमत केला जाईल, अशी माहिती सिडको अध्यक्ष शिरसाट यांनी शिष्टमंडळास दिली. विजय नाहटा यांनी सदर प्रस्ताव आचारसंहिता लागण्यापूर्वी संमत करून घ्यावा लागेल अशी विनंती शिरसाट यांना केली. शिरसाट यांनीदेखील त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. नवी मुंबईतील जनसामान्यांना भेडसावणाऱ्या विषयाची तत्परतेने दखल घेऊन त्यावर योग्य पध्द्तीने अंमलबजावणी केल्याबद्दल शिरसाट यांचा शिष्टमंडळाने सत्कार केला व त्यांची प्रशंसा केली. नवी मुंबई सिटीजन्स फौंडेशन, नवी मुंबई सोसायटी फेडरेशन व सहकारभारतीने सुरू केलेल्या ट्रान्सफर चार्जेस हटाव मोहिमेला जनसामान्यांकडून उदंड प्रतिसाद दिला आहे.

कुठल्याही प्रकारचे आंदोलन न करता केवळ संवादाच्या माध्यमांतून आणि जन चळवळीच्या माध्यमातून सामान्य नागरिक न्याय कसा मिळवू शकतो, समस्येचे निराकरण कसे करू शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हस्तांतरण शुल्क रद्द करा यासाठीचा लढा आहे. तीन हजार ५०० हुन अधिक निवासी संकुलांनी आपले समर्थन पत्र देऊन या मोहिमेला प्रतिसाद दिला आहे.

या शिष्टमंडळात सतीश निकम, प्रमोद जोशी, भास्कर म्हात्रे, सुभाष म्हात्रे, सुधीर दाणी त्रिवेणी सालकर, कृष्णकांत निमसे, सुनील छाजेड, सुनील चौधरी, रश्मी सकपाळ, उदय तांदळे, रोहित गुप्ता, विनीत मोरे व अन्य सहकारी उपस्थित होते.



**उरण : विघ्नहर्ता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ चिरनेर कातळपाडा यांच्या सहकार्याने चिरनेर कातळपाडा येथील माथेरानच्या वशेणीकर आळी येथे अकरा दिवसांसाठी साखरचौथ गणेशोत्सव साजरा होत आहे. पंढरपूरच्या विठ्ठल रखुमाई व मंदिराच्या प्रतिकृतीचा देखावा असलेल्या चिरनेरच्या विघ्नहर्त्याच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी होत आहे.**



**उरण : न्यू यंग स्टार सार्वजनिक गणेशोत्सव कला क्रिडा मंडळ जासई यांनी आयोजित केलेल्या गौरा गणपती उत्सवा निमित्ताने गणरायाचे कामगार नेते सुरेश पाटील, जासई गाव भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते अमृत ठाकूर, विशाल म्हात्रे, श्री.सोनवणे, अलंकार घरत, कुमार घरत यांनी दर्शन घेतले. या सर्वांचे मंडळाचे अध्यक्ष रमेश म्हात्रे, उपाध्यक्ष शिरीष म्हात्रे आणि सचिव बळवंत पाटील यांनी शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.**

# एलेमेंटरी, इंटरमिजिएट परीक्षा सुरू

**मुंबई : प्रतिनिधी**

शासकीय रेखांकन (एलेमेंटरी आणि इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड) परीक्षा २५ ते २८ सप्टेंबर या कालावधीत होणार आहेत. ही परीक्षा महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाकडून घेतली जाते.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ कायदा लागू झाल्यानंतर, या परीक्षांचे निरीक्षण आता शासकीय रेखाचित्र परीक्षा मंडळाकडून केले जाईल. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी मंजूर झालेला सुधारित अभ्यासक्रम या वर्षीच्या परीक्षांसाठी लागू होईल. प्राथमिक रेखाचित्र ग्रेड परीक्षेचे वेळापत्रक:

महाराष्ट्र शासनाच्या कला निदेशालयाने १८८० साली



प्राथमिक आणि इंटरमीडिएट ग्रेड परीक्षा सुरू केली. पहिल्या परीक्षेसाठी १८ विद्यार्थ्यांपासून सुरुवात झाली, दरवर्षी या परीक्षेला बसणारे सुमारे ३-४ लाख विद्यार्थी पुढे सरकत आहेत. तरुण इच्छुक व्यक्तींमध्ये कला शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे या कल्पनेने या परीक्षांची स्थापना करण्यात आली. या परीक्षा साधारणपणे दरवर्षी सप्टेंबरच्या उत्तरार्धात घेतल्या जातात.

या परीक्षा महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये घेतल्या जातात. या परीक्षा राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जातात आणि यशस्वी विद्यार्थी फाऊंडेशन कोर्स, कमर्शिअल/अप्लाईड आर्ट, टेक्स्टर्निंग्र, फाईन आर्ट यांसारख्या तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी उत्तर शिक्षण घेण्यासाठी पात्र ठरतात डिझाईनिंग, आर्किटेक्चर, इ.टी. सी. या परीक्षा सरकारमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य आहेत.

ज्यांनी एलेमेंट्री परीक्षा उत्तीर्ण केली आहे ते इंटरमीडिएट परीक्षेला बसण्यास पात्र आहेत.

















**पनवेल : विधानसभा मतदार संघाचा सर्वांगीण विकास आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली होत आहे. त्यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात सुमारे एक कोटी १८ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ बुधवारी (दि. २५) झाला. या कामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



# निवडक

## रोह्यात श्री विश्वकर्मा पूजाउत्सव



**रोहे** : विश्वकर्मा सामाजिक सेवा संस्था व विश्वकर्मा आर्मी महाराष्ट्रच्या वतीने दमखाडी येथील श्री विश्वकर्मा मंदिर येथे पूजाउत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या पूजाउत्सवास रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, जिल्हा राष्ट्रवादी सरचिटणीस सुरेश मगर, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, माजी नगरसेवक महेश कोलाटकर, मयूर दिवेकर, सरपंच अमित मोहिते, माजी शहरप्रमुख दुर्गेश नाडकर्णी, प्रकाश कुशवाह, महेश तुपकर, राजु कराड, देवरे आदींनी भेट दिली. यानिमित्त रायगड भूषण शाहीर वैभव घरत यांच्या मराठमोळा पोवाडा स्फूर्ती गीतांचा शाहरी कार्यक्रम आम्ही मराठी घेण्यात आला, तर दुसऱ्या दिवशी शहरातून भव्य मिरवणूक काढून विसर्जन करण्यात आले.

## नेने महाविद्यालयात हिंदी दिवस



**पेण** : भाऊसाहेब नेने महाविद्यालयात हिंदी विभाग व हिंदी अनुवाद प्रमाणपत्र कोर्स आणि बँक ऑफ महाराष्ट्र शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रभाषा हिंदी दिवस समारोह उत्साहात साजरा झाला. या वेळी बँक ऑफ महाराष्ट्र पेण शाखेचे प्रबंधक नितेश विश्वकर्मा यांचे बँक क्षेत्रात हिंदी भाषेचे महत्त्व आणि रोजगाराच्या संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्राचार्य. डॉ. सदानंद धारप, संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने, आईक्यूसी समितीचे प्रमुख प्रा. बी.एम. शिकारे, डॉ. खाडिलकर मॅडम, डॉ. ए.एम.पाटील, प्रा.पी.डी.पाटील, लायब्ररीयन जी.जी. जोशी, प्रा.अस्मिता घरत, प्रा.विजया ठाकूर, प्रा.सुप्रिया धुमाळ व प्रा. गोंधळी, विद्यार्थी उपस्थित होते. यानिमित्ताने काव्यवाचन व शेरोशायरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. काव्यवाचन स्पर्धत सोमन जान्हवी प्रथम, द्वितीय चंदना म्हात्रे, तृतीय पुष्पा चंद्रबास प्रसाद व इशिता मोकल तसेच शेरोशायरी स्पर्धेमध्ये गणेश जाधव प्रथम क्रमांक प्राप्त केला.

## ओबीसी सेल उपाध्यक्षपदी अनंता हिरवे



**खोपोली** : शिवसेना खालापूर तालुका ओबीसी सेल उपाध्यक्षपदी अनंता हिरवे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. हर हर चांगभले धनगर समाज संस्थेचे रायगड जिल्हा सचिव म्हणून ते काम करीत असून गारमाळ गावाचे शिवसेना शाखाप्रमुख आहेत. त्यांना निवडीचे पत्र रायगड जिल्हा संपर्कप्रमुख विजय पाटील, जिल्हा संघटक उत्तम प्रबळकर, खालापूर तालूका प्रमुख संदेश पाटील, प्रसिद्धी प्रमुख भाऊ सणस, शिवसेना नेते संजय देशमुख यांच्या उपस्थितीत देण्यात आले. त्यांची निवड होताच सर्वच स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# रायगडात आठवडाभरात कापणीचा हंगाम

## यंदा ९८ हजार हेक्टरवर भातलागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

यंदाच्या मोसमात पावसाने सुयोग्य साथ दिल्याने भातपिक जोमात आहे. सध्या हळव्या जातीच्या भाताच्या लोंब्यांमध्ये दाणा भरला असून पीक काढणीला आले आहे. आठवडाभरात भातकापणी हंगाम सुरू होणार असून दिवाळीत खळ्यात भाताच्या राशी लागलेल्या दिसतील. यंदा ९८ हजार हेक्टरवर भातलागवड करण्यात आली आहे.

पुढील काही दिवसांत पावसाने योग्य साथ दिली तर यंदा भात उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी ही समृद्धी घेऊन येणार आहे. मागील वर्षीदेखील रायगडमधील शेतकरी आनंदित होता. पावसाने साथ दिल्याने भाताचा चांगला उतारा मिळाला होता. यंदाही चांगला उतारा मिळणार असून तो भात उत्पादकांसाठी बोनस असणार आहे. रायगड जिल्हा एकेकाळी भाताचे कोठार म्हणून प्रसिद्ध होता, मात्र कालांतराने नागरीकरण आणि औद्योगिकरणामुळे भात लागवड क्षेत्र हे कमी होऊ लागले. यंदा ९८ हजार हेक्टरवर भातलागवड तर ३ हजार हेक्टरवर इतर पिके खरीप हंगामात घेतली आहेत.



यंदा पाऊस हा थांबून थांबून जरी पडला असला तरी समाधानकारक पडला. जून महिन्यात कमी बरसलेल्या पावसाने जुलै आणि ऑगस्टमध्ये कसर भरून काढली. जिल्ह्याची वार्षिक पावसाची सरासरी यंदा सप्टेंबरच्या पहिल्याच आठवड्यात गाठली आहे. जिल्ह्यात समाधानकारक पडलेला पाऊस हा शेतीसाठी लाभदायक ठरला आहे. त्यामुळे भातशेतीला बहर आला असून पिक जोमाने डोलू लागले आहे.

हळवा, गरवा या दोन्ही जातीचे भातपिक सध्या उत्तम स्थितीत आहे. कोठेही बगळ्या किंवा करपासारख्या रोगाचा प्रादूर्भाव नसल्याचे दिसून येत आहे. भाताच्या लोंब्यात दाणा भरला असून काही उन्ह मिळाली की, तो काढणीला येणार आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासूनच भातकाढणी सुरू होणार असून महिनाभरात हे काम संपणार असल्याचे चित्र आहे. त्यामुळे यंदाची भात उत्पादकांची दिवाळी ही गोड जाणार आहे.

हळवे भातपिक कापणीयोग्य झाले असले तरी निमगरवी आणि गरवी भातशेती अजूनही पोटरीच्या अवस्थेत असून काही ठिकाणी दाणा भरण्याच्या स्थितीत आहे. या पिकाला अजूनही पावसाची आवश्यकता आहे. त्यामुळे सध्या पडणारा पाऊस गरव्या भातपिकासाठी पोषक ठरणारा असला तरी त्याचे प्रमाण वाढले तर तो हळव्या पिकांना धोकादायक ठरण्याची भीती आहे.

# ग्रामपंचायतीमध्ये नल जल मित्रांची होणार नियुक्ती -डॉ.भरत बास्टेवाड

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जलजीवन मिशन अंतर्गत राज्यातील पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती होणे अत्यंत आवश्यक असल्याने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये गवंडी, प्लंबर, मेकॅनिक, फिटर व इलेक्ट्रिशियन पंप ऑपरेटर याप्रमाणे तीन नल जल मित्रांची नेमणूक करण्यात येणार आहे.

यासाठी इच्छुकांनी आपापल्या ग्रामपंचायतीशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

याबाबत जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरूस्ती योग्यरितीने व्हावी या उद्देशाने प्रति ग्रामपंचायत तीन नल जल मित्रांची निवड करण्यात येणार आहे. प्रत्येक पदासाठी तीन याप्रमाणे प्रति ग्रामपंचायत नऊ उमेदवारांची नामनिर्देशने राज्यस्तरावर करण्यासाठी ग्रामपंचायतने त्यांची माहिती घेऊन पवर भरावयाची आहेत. ग्रामपंचायतीने सादर केलेल्या नामनिर्देशनामधून राज्यस्तरावरून उमेदवारांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी निश्चित करण्यात आलेल्या कौशल्य संच प्लंबर/गवंडी, मोटर मेकनिक/फिटर, इलेक्ट्रिशियन/पंप ऑपरेटर या तीन ट्रेडसाठी गावातील अनुभव असलेल्या व उचित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येणार आहे. हे कौशल्य असलेल्या उमेदवारास गावातच रोजगार उपलब्ध होणार आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले नाव ग्रामपंचायतीस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जलजीवन प्रकल्प संचालक मिशन शुभांगी नाखले यांनी केले आहे.

# मुरूडमध्ये नैसर्गिक शेती जनजागृती

**मुरूड : प्रतिनिधी**

कृषि विज्ञान केंद्र, किल्ला-रोहामार्फत नैसर्गिक शेतीविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन उसरोली टेप येथे करण्यात आले.

कार्यक्रमास कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर, डॉ. राजेश मांजरेकर व प्रा. जीवन आरेकर, तालुका कृषि अधिकारी मनिषा भुजबळ, शेतकरी उत्पादक कंपनीचे चेअरमन श्रीधर जंजिरकर, कृषि विज्ञान केंद्रचे प्रमुख डॉ. मनोज तलाठी, विशेष कार्यकारी अधिकारी ऋतुजा चौलकर, निकीता रणदिवे, माजी सरपंच सौ. कुमरोठकर, कृषी अधिकारी रवींद्र सैदाणे, माजी कृषी अधिकारी दिलीप पाटील उपस्थित होते.

डॉ. प्रमोद मांडवकर यांनी, कोकण कृषी विद्यापीठाचे विकसित तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याविषयी माहिती दिली. डॉ. राजशे मांजरेकर यांनी नैसर्गिक शेतीचे फायदे, गोआधारीत कार्यप्रणालीविषयी मार्गदर्शन केले. जीवन आरेकर यांनी किडरोग नियंत्रणासाठी जैविक घटकांचा वापर, दशपर्णी अर्काची कार्यपद्धतीविषयी माहिती दिली. मनीषा भुजबळ यांनी नैसर्गिक शेती धोरण तसेच कृषीसंबंधी योजनांची माहिती दिली.




# कोमसापतर्फे वाङ्मयीन पुरस्कारासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

**खोपोली : प्रतिनिधी**

कोमसापतर्फे कोकणातील सभासद साहित्यिकांना विविध वाङमयीन व वाङमयेतर पुरस्कार प्रतिवर्षी दिले जातात. सन २०२३-२४साठी वाङ्मयीन पुरस्कारासाठी पुस्तके मागविण्यात येत आहे. हे सर्व पुरस्कार कोकणातील सभासद लेखकांसाठी आहेत.

ललित गद्य पुरस्कारासाठी कोकणासह गोवा-कारवार- बेळगाव या प्रदेशातील लेखकांचाही विचार केला जाणार आहे. पुरस्कारासाठी आपल्या पुस्तकाच्या दोन प्रती ३१ ऑक्टोबरपूर्वी केंद्रीय कार्यवाह, कवी केशवसुत स्मारक संकुल, मालगुंड, जि. रत्नागिरी-४१५६१५ याठिकाणी पाठवावेत. अधिक माहितीसाठी ९७६४८८६३३०/९०२१७८५८७४) यावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. या पुरस्कारासाठी लेखक, कवी हे कोमसापच्या सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे, मुंबई, नवी मुंबई या परिसरातील आणि आजीव सभासद असणे आवश्यक असून, तशा प्रकारचे कोमसाप जिल्हाध्यक्ष अथवा शाखाध्यक्षांचे प्रमाणपत्र किंवा सभासद पावतीची छायांकित प्रत यासोबत जोडणे आवश्यक आहे.

पुस्तकाच्या वाङमय प्रकाराचा स्पष्ट निर्देश लेखकाने करावयाचा आहे. वरील पुरस्कारासाठी पुस्तके ही १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत प्रसिद्ध झालेली असावीत. या पुरस्कारासाठी जास्तीत जास्त सभासदांनी पुस्तके पाठविण्याचे आवाहन कोमसापच्या केंद्रीय अध्यक्षा नमिता कीर, केंद्रीय कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी केले आहे.

# गारमेंट युनिटकरिता सुपरव्हायजर नियुक्तीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महिला व बालविकास विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालयांतर्गत जिल्हा वार्षिक योजना डिपीडीसी अंतर्गत गारमेंटच्या युनिटकरीता अनुभवी व प्रशिक्षित सुपरव्हायजर नियुक्त करावयाचे आहेत.

माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन या चार ठिकाणी महिला बचत गटातील महिलांना स्थानिक रोजगार मिळावा म्हणून प्रत्येक गारमेंट युनिटकरिता आवश्यक असलेल्या शिलाई मशीन्स ७, काज-१, बटण, ओव्हार्लोक मशीन १, कटिंग मशीन १ व इस्त्री १ खरेदी करण्यात आल्या आहेत. या मशीन्सवर गारमेंटच्या अनुषंगाने गाऊन, पेटीकोट, लेगीज व टॉप, टी-शर्ट, कापडी बॅग, मुस्लीम समाजासाठी लागणारे बुरका व शालेय गणवेश आदी कामाचे सुपरव्हिजन करणे व महिलांना प्रशिक्षण देण्याकरीता अनुभवी व प्रशिक्षित सुपरव्हायजर नियुक्त करावाचे आहेत.

याकरिता प्रशिक्षित सुपरव्हायजरचे वय २१ ते ४५ असणे आवश्यक आहे, तसेच टेलरिंग प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र व शिक्षण किमान १०वी पास असावे. इच्छुकांनी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा समन्वय अधिकारी अशोक चव्हाण यांनी केले आहे.

# माथेरानमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस

## वातावरणात बदल; सर्वत्र धुक्याची चादर

**माथेरान : प्रतिनिधी**

गेले काही दिवस पावसाने विश्रांती घेतली होती, मात्र वेधशाळेने वर्तवली होती. माथेरान शहराला सोमवारी दुपारपासून धुक्याने वेढले होते, तर सायंकाळपासून विजांच्या कडकडाट, ढगांच्या गडगडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली.



पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे माथेरान शहरात पण थोड्या फार प्रमाणात उष्मा जाणवत होता. त्यातच या ठिकाणी हवामान वेधशाळेने दिलेल्या सूचनेनुसार येथे पावसाचे वातावरण निर्माण झाले होते. माथेरानमध्ये सर्वत्र धुक्याचे वातावरण निर्माण झाले होते. पर्यटक संख्या कमी असल्याने सर्वत्र शुकशुकाट दिसून येत होता. धुक्यामुळे सर्वत्र अंधार झालेला दिसत होता. शहरातील रस्ते ओस पडल्याचे चित्र होते.

मागील दोन दिवस पडलेल्या परतीच्या पावसामुळे आणि त्यातच पावसाच्या साथीला ढगांचा गडगडाट तसेच विजांचा कडकडाट यामुळे घराबाहेर असलेल्या नागरिकांची मोठी त्रेधातिरपीट उडाल्याचे दिसले. शहरातील विद्युत पुरवठादेखील वारंवार खंडित होत होता. येथे परतीच्या पावसाने माथेरानवासीयांना पुन्हा एकदा या ठिकाणी सुखद अनुभव मिळाला.

# तांबाटी ग्रामपंचायतीतर्फे नेत्र तपासणी शिबिरातून जनजागृती

**चौक : प्रतिनिधी**

शासकीय योजनांची यशस्वी अंमलबजावणी व त्यांची जनजागृती होण्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी नेत्र तपासणी शिबिर आयोजित केले होते.

पनवेल येथील सुप्रसिद्ध डोळ्यांचे डॉ. सुहास हळदीपुरकर हॉस्पिटल यांच्या सहकार्याने व ग्रामपंचायत तांबाटी यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत हद्दीतील व परिसरातील नागरिकांच्या डोळ्यांची काळजी घेणे व तपासणी शिबिर आयोजित करून त्याच ठिकाणी योजनांची माहिती व जनजागृती केली.

ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांची मोफत डोळ्यांची तपासणी केल्याने लाभार्थ्यांनी आभार व्यक्त केले. तपासणीत आठ जणांना शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे पाठविण्यात आले. विनोद पाचोरे आणि त्यांचे टीमने विशेष मेहनत घेतली आहे, तसेच शिबिर यशस्वी करण्यासाठी सरपंच अविनाश आमले, ग्रामसेवक प्रशांत कदम तसेच कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

उपसरपंच शितल पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य हरीभाऊ जाधव, संतोष दळवी, सुरेश पवार उपस्थित होते.



# अंजुमन इस्लाम महाविद्यालयातर्फे विविध उपक्रम

**मुरूड : प्रतिनिधी**

दरवर्षी २४ सप्टेंबर रोजी देशभरात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड जंजिरा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.




महाविद्यालयांत मंगळवारी स्वयंसेवकांची उद्‍बोधन कार्यशाळा झाली. यामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांनी या योजनेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी व सामाजिक दायित्व जोपासण्याचे आवाहन केले. प्रा. निदा गोरमे, अरफा कल्बसकर, रिद्धी भगत व स्वालेहा कडू यांनी रासेयोचे त्यांचे अनुभव उपस्थितांना सांगितले.

विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन या विषयावर जनजागृतीपर पथनाट्य बाजारपेठेत सादर करून नागरिकांना प्लास्टिक व प्रदूषणाचे पर्यावरणावर होणारे परिणाम याबद्दल जनजागृती केली.

भित्तीपत्रके, रांगोळी स्पर्धांसह विविध उपक्रम राबवून हा सप्ताह साजरा करण्यात आला.

# धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षणासाठी निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी तालुका धनगर समाज संघटनेच्या वतीने कर्जत तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले.

या वेळी धनगर समाजाचे अध्यक्ष अ‍ॅड. संतोष आखाडे, उपाध्यक्ष बाळासाहेब आखाडे, खजिनदार नारायण बाडेकर, माथेरानचे माजी अध्यक्ष राकेश कोकळे, नेरळ ग्रामपंचायतीचे माजी सदस्य संतोष आखाडे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते. धनगर समाजाला अद्याप अनुसूचित जमातीमध्ये आरक्षण मिळाले नाही. महाराष्ट्रातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीतील आदेशाची त्वरित अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी निवेदन दिले.



# टी-२० वर्ल्डकपसाठी भारत सज्ज!

## प्रतिष्ठित ट्रॉफी जिंकणे आमचे स्वप्न -कर्णधार हरमनप्रीत कौर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

यूएईच्या धर्तीवर ३ ऑक्टोबरपासून महिलांच्या ट्वेंटी-२० विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. आपल्या पुरुष संघाप्रमाणे आपणही विश्वचषकाची ट्रॉफी जिंकावी यासाठी भारताचा संघ मैदानात असेल. याबाबत कर्णधार हरमनप्रीत कौरने एक सूचक विधान केले असून विश्वचषकाची प्रतिष्ठित ट्रॉफी उंचावण्यासाठी आम्ही आतुर असल्याते तिने सांगितले.



हरमनने सांगितले की, ही प्रतिष्ठित ट्रॉफी जिंकणे हे आमच्या संघाचे स्वप्न आहे. मला वाटते, एक संघ म्हणून आमच्याकडे ट्रॉफी जिंकण्यासाठी आवश्यक ते सर्वकाही आहे. भारतीय संघात कशाचीच कमतरता नाही. आम्ही जगाच्या पाठीवर कुठेही खेळत असलो तरी तमाम भारतीयांचा आम्हाला पाठिंबा असतो. संघातील प्रत्येक सदस्याचे लक्ष्य विश्वचषकावर नाव कोरण्याचे आहे. ही ट्रॉफी जिंकावी हे आमचे स्वप्न आहे आणि मला वाटते की एक संघ म्हणून आम्ही हे नक्कीच करू.

आम्ही २०२०च्या स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली होती. यूएईमध्ये खेळण्याची आमची ही पहिलीच वेळ असेल, पण खेळाडूंमध्ये चांगला उत्साह आहे. मला खात्री आहे की, आम्ही दुबई आणि शारजाहमध्ये खेळू तेव्हा मोठ्या संख्येने प्रेक्षकांची गर्दी जमेल, असेही भारतीय कर्णधार हरमनप्रीतने आयसीसीशी बोलताना सांगिले. भारतीय संघ ४ ऑक्टोबरला न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यातून अभियानाची सुरुवात करेल.

## जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत 'सीकेटी'चा अवधूत नाईक प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिकेच्या वतीने खोपोली येथे आयोजित जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजमधील अवधूत सागर नाईक (इ. अकरावी सायन्स) याने प्रथम क्रमांक मिळविला. या विद्यार्थ्याची विभागीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

अवधूतने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अवधूतचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## जिल्हास्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा

# आचल राजभर, गुरुप्रीत प्रसाद, गायत्री बडेकर, सार्थक शिंदे सरस



**कर्जत : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद रायगड व क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने जिल्हास्तरीय शालेय १७, १९ वर्षे मुले आणि मुलींची वेटलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच कर्जतमध्ये झाली. यामध्ये आचल राजभर, गुरूप्रीत प्रसाद, गायत्री बडेकर व सार्थक शिंदे यांनी सुवर्णपदक पटकाविले. सहा तालुक्यातील १०६ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

अभिनव ज्ञान मंदिरच्या सभागृहात जिल्हास्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन मुख्याध्यापक धुराजी शिंदे यांच्या हस्ते झाले. या वेळी संस्थेचे सहसचिव श्रीकांत ओक, उपमुख्याध्यापिका सौ. बारगजे, रामभाऊ वाघमारे, वेटलिफ्टिंग असोसिएशन रायगडचे सचिव सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते. मुख्य पंच नवनाथ दाभाडे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

पंच म्हणून सिद्धार्थ शिंदे, यश गायकवाड, बबन झोरे, प्रथमेश केवणे, विनायक शिर्के यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास क्रीडा अधिकारी भक्ती तिवारी, उपमुख्याध्यापिका अंकिता दाभाडे, ऋणाली पारधी, खरात, वेटलिफ्टिंग असोसिएशन रायगडच्या उपाध्यक्ष जयमाला जांभळे, विजय मोरे उपस्थित होते. यशस्वी खेळाडूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदके देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन धनश्री कानडे यांनी केले, तर आभार संदेश देशमुख यांनी मानले.

# माहीम जुवेनील चषक कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लब, शिवाजी पार्क व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे २५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या कॅरम स्पर्धेत शालेय-कॉलेजमधील ज्युनियर ३२ खेळाडूंमध्ये अजिंक्यपदाचा माहीम ज्युवेनील चषक पटकाविण्यासाठी चुरस होईल.

मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील शालेय ज्युनियर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कॅरम स्पर्धा होत असून पहिल्या १६ विजेत्या-उपविजेत्यांना माहीम जुवेनील स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष विजय येवलेकर व उपाध्यक्ष विकास खानोलकर यांच्या हस्ते आकर्षक १६ पुरस्कारांसह स्ट्रायकरद्वारे गौरविण्यात येणार आहे. माहीम जुवेनील पव्हेलियन, शिवाजी पार्क येथे ही विनाशुल्क कॅरम स्पर्धा रंगणार आहे.

श्रीशान पालवणकर वि. बालाजी काठूरोजीगारी आणि पृथ्वी बडेकर वि. शुभम परमार यामधील उद्घाटनीय लढती एमजेएससीचे सेक्रेटरी सुनील पाटील, खजिनदार महेश शेट्ये व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहेत.

# जिल्हास्तरीय थ्रो बॉल स्पर्धेत 'सीकेटी' संघ विजेता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयाच्या संघाने जिल्हास्तरीय थ्रो बॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. या संघाची मुंबई विभागीय थ्रो बॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय थ्रो बॉल स्पर्धेचे आयोजन खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल या ठिकाणी करण्यात आले होते. या स्पर्धेत सीकेटी माध्यमिक विद्यालयाच्या १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पनवेल महापालिकेतर्फे शालेय फुटबॉल आणि वुशू स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद रायगड, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व पनवेल महापालिका क्रीडा व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त पनवेल महापालिका जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन इंडो स्कॉट्स स्कूल कामोठे येथे, तर वुशू स्पर्धेचा आयोजन रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर येथे करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेस अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त प्रसनजीत कारलेकर, क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख नामदेव पिचड, क्रीडा विभागाचे समीर रेवाळे, प्रतिक म्हात्रे, रामशेठ ठाकूर कॉलेजचे मुख्याध्यापक व कर्मचारीवर्ग तसेच इंडो स्कॉट्स स्कूलचे मुख्याध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## जलतरणपटू अमुल्या शहाचे सुयश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिल्ली इंटरनॅशनल स्विमेथोन स्पर्धेत नवीन पनवेल येथील अमुल्या शहा हिने सुयश प्राप्त केले आहे.

अमुल्याने तीन किमी अंतरामध्ये प्रथम क्रमांक, ५०० मीटरमध्ये द्वितीय आणि २०० मीटरमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत तीन किमीच्या खुल्या गटात उतरणारी आणि जिंकणारी १० वर्षीय अमुल्या ही सर्वांत लहान स्पर्धक ठरली. त्यासाठी तिला प्रशिक्षक समर्थ नाईक यांचे मार्गदर्शन लाभले.

## बेंचप्रेस स्पर्धेत सुरेश डुबल अव्वल



**कळंबोली** : इंडियन पॉवरलिफ्टिंग फेडरेशन संलग्न ऑल इंडिया स्वदेशी खेळ असोसिएशनच्या वतीने हरियाणातील सोनिपत येथे झालेल्या राष्ट्रीयबेंचप्रेस स्पर्धेत कळंबोलीतील सुरेश डुबल यांनी अव्वल स्थान पटकावले. त्यांनी एकूण ७४ किलो वजन उचलले.

## 'आरडीसीए'तर्फे १४ वर्षांखालील मुलांची निवड चाचणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने राज्यस्तरीय १४ वर्षांखालील मुलांची आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धा होणार असून त्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)तर्फे १४ वर्षांखालील खेळाडूंची जिल्हा संघ निवड चाचणी २६ व २७ सप्टेंबर रोजी खारघर इनामपुरी सेक्टर ३७मधील बी.पी. पाटील स्पोर्ट्स अकॅडमी येथे घेण्यात येणार आहे.



या निवड चाचणीकरिता १ सप्टेंबर २०१०नंतर जन्मलेल्या खेळाडूंचा विचार करण्यात येईल. निवड झालेल्या खेळाडूंना एमसीएच्या राज्यस्तरीय आमंत्रितांच्या स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

सर्व खेळाडूंनी निवड चाचणीसाठी येताना नवीन फोटो अपडेट आधार कार्ड झेरॉक्स प्रत, जन्म दाखला झेरॉक्स प्रत, मागील तीन वर्षाची शाळेची मार्कलिस्ट झेरॉक्स प्रत सोबत आणावी तसेच सफेद क्रिकेट पोशाखात स्वतः:च्या क्रिकेट साहित्यासह हजर रहावे. अधिक माहितीसाठी (९९८७१५४६५२) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांनी केले आहे.

# खालापूर तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा उत्साहात

**खोलीली : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवासंचलनालाय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग आयोजित तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन सोमवार-मंगळवारी जनता विद्यालय खोपोली येथे केले होते. या स्पर्धेत खोपोलीसह खालापूर तालुक्यातील वीसहून अधिक शाळेतील १५० कुस्तीपटूंनी सहभाग घेऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले.

स्पर्धेच्या उद्घाटनाला खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबू जळगावकर, बांधकाम व अर्थ सभापती यशवंत साबळे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे सदस्य गुरुनाथ साठेलकर, खालापूर तालुका क्रीडा समन्वयक जगदीश मरागजे, मुख्याध्यापक पीजी देशमुख, उपमुख्याध्यापक हेमंत खाडे, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक राजाराम कुंभार, मितेश शहा, संजय शिर्के, प्रा. जयवंत माने आदी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी राज्यस्तरीय पंच सावळेराम पायमोडे, रोशनी परदेशी, दिवेश पलांडे, विनोद जाधव, ओंकार निंबळे यांनी मोलाची कामगिरी बजावली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ क्रीडा शिक्षक राजाराम कुंभार, प्रार्थना भोपतराव, बुवा सर यांनी मोलाचे सहकार्य केले. या स्पर्धेतील विजयी कुस्तीपटूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



## 'सीकेटी'च्या मधुरा पाटीलची जलतरण स्पर्धेत राज्यस्तरावर निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणेतर्फे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई उपनगर आयोजित विभागीय जलतरण स्पर्धेमध्ये नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थीनी मधुरा गिरीश पाटील (इ. १२ सायन्स) हिने ५० मीटर बॅक स्ट्रोक प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. तिची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

मधुराची राज्यस्तरावर निवड झाल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रायगड जिल्हा ज्युनिअर टेनिसबॉल क्रिकेट निवड चाचणी उत्साहात



**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्हा टेनिसबॉल क्रिकेट संघटना व ट्रॉफी फाईटर्स फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा ज्युनिअर (१९ वर्षाखालील) टेनिसबॉल क्रिकेट निवड चाचणीचे आयोजन पेण येथे नुकतेच करण्यात आले.

या निवड चाचणीतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी राज बामुगडे रोहा, कुणाल पाटील पनवेल, ऋग्वेद मोरे कर्जत, संस्कार देशमुख कर्जत, कुणाल पाटील पेण, हार्दिक म्हात्रे पेण, आयुष दिघे सुधागड, सुयश वाघमारे पाली, विघ्नेश थिटे रोहा, विराज म्हात्रे पेण, आयुष मनवे कर्जत, पार्थ कोळी उरण यांची निवड करण्यात आली आहे. टीम प्रशिक्षक महेश म्हात्रे व टीम व्यवस्थापक म्हणून जयदीप पाटील हे कामगिरी पहाणार आहेत.

निवडलेले संघ नंदुरबार येथे २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या ज्युनिअर राज्यस्तरीय टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या संघाचे प्रतिनिधित्व करतील. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ट्रॉफी फाईटर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष सुधाकर म्हात्रे सर्व सदस्य व रायगड जिल्हा टेनिसबॉल क्रिकेट असोशिएशनचे पदाधिकारी तसेच ॲड.मंगेश नेने यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या निवड चाचणीसाठी रायगड टेनिस क्रिकेट टेक्निकल डायरेक्टर भरत गुरव, जिल्हा टेनिस क्रिकेट संघटना उपाध्यक्ष किरण पाटील, समालोचक जितेंद्र पाटील, रवींद्र पाटील, पेण तालुका क्रिकेट ४०+ अध्यक्ष सतीश पाटील, रायगड भूषण संतोष पाटील, वाशी विभाग क्रिकेट अध्यक्ष नरेश म्हात्रे, रायगड भूषण रत्नाकर ठाकूर, राष्ट्रीय टेनिस खेळाडू हर्षल नरेश म्हात्रे, अजिंक्य पाटील, प्रफुल्ल म्हात्रे, सुशिल म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, सचिन म्हात्रे, अभिषेक म्हात्रे, महेश म्हात्रे, विनायक म्हात्रे, किशोर म्हात्रे, शंतनू परब, ऋषी पवार, जयदीप पाटील या सर्वांनी काम पाहिले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com